
# श्री दत्तचरित्रसार



श्रीगणेशायनम:



श्रीसरस्वत्यैनम:



श्रीसद्गुरवेनम:

## अध्याय १ ला

**गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्दैवो महेश्वर : ।**
**गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवेनम: ॥१॥**

प्रारंभी नमू श्री गजानना । विघ्नकानन छेदना ।
सर्वांसी वंद्य देवराणा । शिवगिरिजा पुत्र जो ॥१॥
माझें नमन तवपायीं । दत्तचरित्रसार कार्यीं ।
सद्गुरु प्रेरणेचे ठायीं । विघ्न नसावें तवकृपें ॥२॥
वर्णावया तवगुण । मला सामर्थ्य नाहीं जाण ।
परी वारंवार वंदन । तुमच्या पदी करीतसें ॥३॥
तुम्ही देव दयासागर । ज्ञान स्वरूप निरंतर ।
तव वर्णन कोठवर । अज्ञानें मी करावें ॥४॥
मोठमोठेही देवगण । प्रारंभीं आपणा स्तवून ।
निर्भयवचन घेऊन । मग कार्ये आरंभिती ॥५॥
यापरी आपुला महिमा । थोर आहे पुरुषोत्तमा ।
त्याप्रमाणें दावून प्रेमा । दत्तादासा सांभाळीं ॥६॥
यति नृसिंह सरस्वती । तवपुरीं मठीं राहती ।
आरंभी आपणा स्थापिती । विघ्नहरा, विनायका ॥७॥



नंतर श्रीगुरु प्रवेशती । अशी तव गुणांची ख्याती ।
द्या हो आशिर्वाद गणपती । वरदायका मोरेश्वरा ॥८॥
कृपानिधे त्वरें करुन । व्हावें गणनाथा प्रसन्न ।
आपल्या चरणां नमन । करितों प्रेमे सद्भावें ॥९॥
दास अज्ञानी असमर्थ । आपण ओंकार समर्थ ।
म्हणून तव स्तुति यथार्थ । होत नाहींच स्वल्पही ॥१०॥
गजवदना हा विद्यार्थी । दत्तचरित्रसार ग्रंथीं ।
मागे अक्षय कृपाग्रंथी । कार्य आपुलें मानूनियां ॥११॥
ग्रंथ व्हावा पुरा चांगला । लेखक वाचक श्रोत्याला ।
सर्वांस अक्षय सांभाळा । सदा सन्मार्गी प्रेमानें ॥१२॥
संकटहारी गजानन । कारुण्य दृष्टीनें द्रवून ।
देती प्रसाद आशीर्वचन । त्यांना नमन पुन्हां पुन्हां ॥१३॥
आतां नमूं शारदामाता । जी विमल विद्या देवता ।
तिजवांचूनि सर्व वृथा । ऐशी देवी सरस्वती ॥१४॥
नमन असो तव पायीं । श्रीदत्तचरित्र ग्रंथाठायीं ।
साह्य करीं लेखनकार्यी । विद्या देवते शारदे ॥१५॥
कराया यथार्थ तवस्तुती । ब्रह्मादि देवही थकती ।
तेथें मम गति ती किती । नाहीं मति वर्णावया ॥१६॥
वेदशास्त्रें तशीं पुराणें । सर्वही देवी त्वांच जाणे ।
तव महिमा कोणी नेणे । ऐसी अगम्य तूं अससी ॥१७॥
तव चरणीं ही विनंती । ग्रंथ लिहाया द्यावी मती ।
तुजसी देवी सरस्वती । विनवी बाळ प्रेमभरें ॥१८॥
प्राचीन वैदिक संस्कृती । असे सर्वदा ओघवती ।
आई माते लाडिक हस्तीं । लिहव योग्य प्रकारें ॥१९॥
लिहिती वाचिती ऐकती । त्यांना नसो इहपर खंती ।
सांभाळोनि विनयवृत्ती । देईं कृपेनें अक्षय ॥२०॥
माझें इष्ट करावें पूर्ण । विद्यादेवते सत्वर जाण ॥
मयूर वाहनीं बसून । करिसी गायन मोदभरें ॥२१॥



कोप नाहीं आपुल्या मनीं । श्वेतवस्त्रा स्मिता हर्षिणी ॥
मुदित मनें प्रकाशूनि । प्रसन्न होसी भक्तांना ॥२२॥
शारदामाता सुप्रसन्न । ग्रंथा देई आशीर्वचन ॥
ज्ञानवृत्ति बाणवून । वत्सलता दावीतसे ॥२३॥
आतां विधि हरि शंकर । यांना करूंया नमस्कार ॥
तव लीला गहन फार । नाही कळत कवणाही ॥२४॥
सत्त्व रज तम त्रिगुण । दत्त चंद्र दुर्वास बनून ॥
दत्तनगर काया धरून । रक्षितां भक्तां प्रेमानें ॥२५॥
तुमच्या हातीं सर्व सत्ता । उत्पत्ति पालन संहारता ॥
भिन्न भिन्न रूपें दाविता । मागणें कल्याण करावें ॥२६॥
दत्तचरित्रसार ग्रंथ । परम पवित्र अमृतार्थ ॥
अक्षरें असावीं यथार्थ । तवकृपेने दयाळा ॥२७॥
तुम्हांत नसे भेद कांहीं । तुम्ही सर्व एकाचि पाहीं ॥
नट नाना वेष घेई । परी ती व्यक्ति एकची ॥२८॥
संरक्षावे साधुजन । दुष्टां वळवून वा मर्दून ॥
करावया लोककल्याण । अवतरून येतसां ॥२९॥
किती करावी तव स्तुती । नाहीं कळत मजप्रती ॥
ग्रंथ साह्याची ही विनंती । लाडिवाळपणें करीतसें ॥३०॥
त्रैमूर्ति तथास्तु म्हणती । सर्वजन ग्रंथें तरती ॥
इहपर मिळे सुखस्थिती । ऐकून चित्त सुखावलें ॥३१॥
इंद्रादि देवां लोकपालां । नमूनियां भावें सकलां ॥
या ग्रंथा साह्य व्हावयाला । प्रार्थीतसें प्रेमभरें ॥३२॥
सर्व देवतांना नमस्कार । करीत असें वारंवार ॥
ग्रंथा दत्तचरित्रसार । आशीर्वचन अर्पावें ॥३३॥
न लावावा आतां उशीर । श्रद्धाभक्तीनें नम्र अंतर ॥
अहो सर्व निर्जर अमर । प्रसन्न व्हा हें मागतसें ॥३४॥
ओळखूनियां सद्भाव । मूदित उदेले सर्व देव ॥
त्यांचा नायक इंद्रराव । देतसे आशीर्वाद प्रेमें ॥३५॥

आदि माते क्रियाशक्ती । सर्व असे गे तुझ्याच हातीं ॥
मणिद्वीपीं तुझी वसती । तुला वदंन प्रीतीनें ॥३६॥
दृश्य अदृश्य नाना योनी । नर नारी वेष धरोनी ॥
चालविसी खेळ जननी । सर्व कांहीं तव लीला ॥३७॥
जगाची माता तूंच असती । तुला वंदितों सद्भावेंसी ॥
कोप न करावा मानसीं । कृपा करावी अक्षय ॥३८॥
तुला विसरोनी जे वर्तती । ते सत्य आमार्गीं पडती ॥
परंतु तुला जे जे स्मरती । ते ते तरती निश्चयानें ॥३९॥
ऐसा तुझा महिमा थोर । वर्णावया असमर्थ हर ॥
तव चरणीं निरंतर । नम्र होऊन प्रार्थीतसें ॥४०॥
दत्ताज्ञेचें लेखन संथ । दत्तचरित्रसार ग्रंथ ॥
वास करावा माते येथ । आणि संरक्षीं बाळांना ॥४१॥
सर्व कांहीं तूंच असती । ग्रंथरूपीं तूंच नटसी ॥
अक्षय कृपेनें सर्वांसी । पाळीं मातोश्री अखंड ॥४२॥
मन करितें नाना खोडी । पण मातोश्री तूं वावडी ॥
होऊं नको देईं आवडी । शुद्ध निर्मळ भक्तीची ॥४३॥
सन्मार्गें घे गे सुधारून । करितों वारंवार नमन ॥
आदिमाये कृपा करून । पाळीं मजला सर्वस्वी ॥४४॥
आहे अज्ञानी तव बाळ । परी तूं जननी प्रेमळ ॥
अंतर्बाह्य दूर जवळ । राहुनी राखीं सर्वदा ॥४५॥
येणेपरी करितां स्वतन । आई देई आशीर्वचन ॥
तेव्हां होऊ मुदित मन । माता केवळ कृपाब्धि ॥४६॥
सिद्ध ऋषि गाई ब्राम्हण । व्यास वाल्मिकादि कविजन ॥
ग्रह तारका दिशा दिन । नमितां कृपा ते करिती ॥४७॥
ग्राम इष्ट कुलदेवता । पुरोहित पूर्वज मातापिता ॥
श्रोते सज्जन सर्वां नमितां । अमित आनंद होतसे ॥४८॥



त्यांचा मिळाला आशीर्वाद । आतां नमूं आनंद कंद ॥
श्रीगुरुदेव दत्त सिद्ध । सद्गुरु कृपेची माउली ॥४९॥
देव सिद्ध ऋषि ब्राम्हण । आईबाप वंश संपूर्ण ॥
विश्व चालवी घालून प्राण । चैतन्यमूर्ति दत्तगुरु ॥५०॥
स्वामी नरसिंह सरस्वती । सदाकाळ सांभाळ करिती ॥
माझे सद्गुरु तेच असती । श्रीगुरु दत्त अवतारी ॥५१॥
आई बाळा काय जमेल । मति तिची अल्प केवळ ॥
परी श्रीगुरुदेव दयाळ । सर्व कांही जाणतसे ॥५२॥
त्यांच्या समान अन्य त्राता । नसे कोणी कुठेंही आर्ता ॥
कशी असे गुरूची ममता । ती वर्णितां न येतसे ॥५३॥
गुरुचरणां ही विनंती । माझी असे अत्यल्प मती ॥
तव गुण न वर्णवती । काय करावें कळेना ॥५४॥
आजवरी केला सांभाळू । गुरुराया तूं प्रेमळ ॥
तव गुणांचे वर्णन बाळू । करूं इच्छी नकळे पैं ॥५५॥
श्रीगुरुप्रेम कसें असे । तें सांगतां न येतसे ॥
इतर सुख तुच्छ भासे । गुरुप्रेमापुढें सर्व ॥५६॥
ऐसा तुझा थोर महिमा । तव चरणा अनन्य प्रेमा ॥
ठेवूनि घेई पूर्ण-कामा । नरहरी स्वामी सद्गुरु ॥५७॥
तव रूप मी न विसरावें । तव प्रेमीं सदा रंगावें ॥
सर्वहित नित्य करावें । अभंग अक्षय दयाळा ॥५८॥
मद गर्व कधीं नसावा । तुझा विसर न पडावा ॥
हेंचि दे श्रीगुरुदेवा । दास मागे तव सेवा ॥५९॥
माझें कांहीं नाहीं उरलें । सर्व तुम्हां अर्पण केलें ॥
अखंड चालवून घ्या भलें । नित्य सन्मार्गीं तव लोभ ॥६०॥
असें स्मरतां गुरुचरणां । दाखविती स्नेहकिरणा ॥
आज्ञा देती चरित्र लेखना । भक्तजनांला सुखवाया ॥६१॥



सर्व दृश्य हें नाशवंत । परी आत्मरूप शाश्वत ॥
त्या मिळवाया देव देत । मनुष्य-देह सत्यत्वें ॥६२॥
पण मिळतां हा जन्म । जाती विसरून मुख्य कर्म ॥
हीच हरीची माया परम । मोठी दुस्तर जी असे ॥६३॥
जें असे नामरूपातील । त्याचें वर्णन शक्य न होत ॥
वेदही स्तब्ध झाले जेथ । तेथें कायसें सांगावें ॥६४॥
असलें जें कांहीं असे । त्यापासून सर्वहि दिसे ॥
तें सर्वांचे घर उत्तमसें । तेथें ज्ञानें जावयाचें ॥६५॥
ती सद्वस्तु मिळवायाला । नरदेह लाभला भला ॥
त्याचें सार्थक करण्याला । सिद्ध झालें पाहिजे ॥६६॥
तें ब्रम्ह सम निर्दोष । क्षीर समुद्रींचा पुरुष ॥
ज्याची शय्या भुजंग शेष । सृष्टि आरंभी ज्यावेळीं ॥६७॥
तो काळ कोणी न जाणे । एका श्रीसद्गुरुविणे ॥
गुरुकृपें अनुभव घेणें । परी वदणे न होत ॥६८॥
त्या परमात्म्यापासून । हें सर्वही झालें उत्पन्न ॥
ही अभंग अक्षय खूण । निश्चयें मनीं ठसवावी ॥६९॥
त्यानेंच सर्वही व्यापून । करी ब्रह्मांडाचें पालन ॥
बधुं भगिनी सर्व जन । द्वेष कोणाचा न करावा ॥७०॥
सर्वांसि पहावें समान । नाहीं कोणीही थोर सान ॥
हें तत्त्व असे सनातन । अंतरीं पूर्ण शोधावें ॥७१॥
या अंतर्विचारामधून । करावें आपलें वर्तन ॥
मग कळवळेल भगवान । आणि कृपा करील ॥७२॥
या सत्य विचारापासून । जर दूर जाईल मन ॥
तर ईश्वराचें गमन । तितकेंच दूर होईल ॥७३॥
या विचारा करा जतन । हें असे प्रथम वर्तन ॥
सर्वांवरी प्रेम धरून । सदा जागृत रहावें ॥७४॥

हा विचार ज्याचा सुटला । तो निद्रेसीच वश झाला ॥
म्हणून अशा विचाराला । साधकानें टाकूं नये ॥७५॥

यापरी जरी विचार करी । गुरु धावून येती तरी ॥
आणि तयाला मूळ घरीं । नेती लीलया प्रेमानें ॥७६॥

श्रीसद्‌गुरु शोधावयाला । वृथा न करा उपायाला ॥
नित्य करा विचार भला । मग सांपडे सत्य पथ ॥७७॥

ते शोधून नाहीं मिळत । तेच सदा शोध करीत ॥
भक्त-हृदय त्यांना कळत । तें भक्त अक्षय जाणती ॥७८॥

जो अधिकारी सत्य झाला । तेथें सद्‌गुरु धांविन्नला ॥
असाच अनुभव आला । आजवरी सर्वां निश्चयें ॥७९॥

यासाठी श्रीगुरु भेटाया । करा सावधान उपाया ॥
संतवचनें मार्ग धराया । लागणे हें प्रथम काम ॥८०॥

सदा आळवावें देवासी । कांहींच नकळे आपणासी ॥
बुद्धि माझी करा शुद्धशी । श्रीगुरु दत्ता अविनाशा ॥८१॥

आहें अज्ञ मूढ पामर ॥ तूं गुरु दत्ता तारणार ॥
तुजवरीच माझा भार ॥ आहे असो सर्वदा ॥८२॥

माझा इष्ट सखा सोयरा । आपण देवा नित्य आसरा ॥
जग संपूर्ण धागा दोरा । सद्‌गुरुनाथा समर्थ तूं ॥८३॥

तरी चित्त हें तुझ्यापायीं । लीन ठेव गा सदा उपायीं ॥
सन्मार्गीं चलो सर्वांठायीं । नमितों भावें पुन्हां पुन्हां ॥८४॥

अशा परी नम्र प्रार्थना । देवाजीची भाकावी करुणा ॥
मग तो सद्‌गुरु दत्त राणा । योग्य सन्मार्ग दाखवील ॥८५॥

आपल्या चरणांचा आश्रय । देईल हा बोल निश्चय ॥
श्रीगुरु दत्त प्रेममय । सत्य सर्वदा रक्षील ॥८६॥

दृढ भक्तीनें प्रार्थना करणे । हा सोपा मार्ग धरणे ॥
मग सद्‌गुरु पूर्णपणे ॥ देतील साच निजस्थान ॥८७॥



असें श्रीगुरु लिहविती । त्यांची लीला तेच जाणती ॥
माझी तेथें न चले मती । नमन असो गुरुराया ॥८८॥

परमेशलीला वर्णावी । त्यामुळें लागे निष्ठा बरवी ॥
पठण करितां ती सद्भावीं । ईश जवळी होईल ॥८९॥

अशा रसाळ कथा पुढील । अध्यायीं सद्‌गुरु लिहवील ॥
त्यांचा लाभ घ्या हो सकळ । करील कृपा श्रीगुरु ॥९०॥

गुरुदेवा परम समर्था । आज्ञापिसी लिहिण्या ग्रंथा ॥
तव कार्य स्वामि समर्था । पूर्ण करोनी घ्यावें हो ॥९१॥

लोक आम्ही दीन मूढ । जगीं वागतों जशी रूढ ॥
आपुलें रूप अति गूढ । परी सोड तूं न करिसी ॥९३॥

वारंवार क्षमा करोनी । पळिसी आम्हां प्रेमळपणीं ॥
तुजसम दयाळु कोणी । नसे कोठेंही गुरुराया ॥९४॥

तवाज्ञेनें करीत कार्य । तें पूर्ण करून घ्या अक्षय ॥
तव कृपा राखो निर्भय । वंशा भक्तां सर्वदा ॥९५॥

जो करील वाचन श्रवण । मननें तव पदीं लीन ॥
त्याला पाहावें बाळसमान । करावें रक्षण सत्पंथें ॥९६॥

त्यासी नसावी भवभीती । द्यावी दयाळा शुद्ध मती ॥
दर्शनही देऊन पुढती । स्वपदीं न्यावें शेवटीं ॥९७॥

अनिष्टें जावीं निरसून । इहलोकीचीं कामे पूर्ण ॥
सन्मार्गानें घ्या करवून । आपुली भक्ति वाढवा ॥९८॥

दत्ता सेवा सदा चुकतों । परी दंडूं नको हे प्रार्थितों ॥
लडिवाळपणें मागतों । प्रेमें घ्या हो सुधारून ॥९९॥

सांगती दत्त सौख्यरथीं । ठेवून चालवीन सत्पथीं ॥
दत्तचरित्रसार ग्रंथीं । प्रथमाध्याम दत्तार्पण ॥१००॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु॥



## अध्याय २ रा

श्रीगणेशायनम: । श्रीसरस्वत्यैनम: । श्रीसद्‌गुरवे नम: ।
बालार्कप्रभुमिंद्रनील जटिलं भस्माङ्गरागोज्जवलम् ।
शांतं नादविलीनचित्तपवनं शार्दूल चर्मांबरम् ॥

ब्रह्मज्ञै: सनकादिभि: परिवृतं सिद्धै: समाराधितम् ।
दत्तात्रेयमुपास्महे हृदि मुदा ध्येयं सदा योगिभि: ॥१॥

जें एक अक्षय असत । नामरूपातील सतत ॥
त्यासी समजावया येथ । ब्रम्ह म्हणावें परापर ॥१॥

या रूपीं जो मिळून गेला । तो अक्षय मुक्त झाला ॥
जन्म-मरण फेरा त्याला । कधींही नसे खरोखर ॥२॥

सर्व-व्यापी ब्रम्ह असत । चैतन्यमय हें समस्त ॥
सागरीं लाटा उद्‌भवत । परी त्या नाहीं जलाविणें ॥३॥

त्याप्रमाणें जग वर्तत । ब्रम्हांत सर्वही वसत ॥
त्या नाहीं आदि मध्य अंत । जगदाभास लाटांसम ॥४॥

सर्व दृश्य हें नाशवंत । मिथ्या म्हणजे अशाश्वत ॥
रूपांतर पावे सतत । ब्रह्ममयच सर्व असे ॥५॥

परब्रह्म अक्षर असत । त्या पासोनि सर्व जनित ॥
अपर ब्रह्म कार्यरत । माया म्हणती त्याजला ॥६॥

ब्रह्मांड हें परापर । त्या वटपत्रीं अहंकार ॥
निर्दोष सम क्षीरसागर । तेथें मुकुंद विराजे ॥७॥

त्या बाल मुकुंदापासून । विधाता जाहला उत्पन्न ॥
सत्त्वापासून रजोगुण । विश्वमानस हा विधि ॥८॥

विष्णु-नाभिकमल-पुत्र । वेदांसम विश्व रचित ॥
विचारवेसण मनाप्रत । घाली विष्णु स्वमानसा ॥९॥

श्रीविष्णूनें वेद दिधले । त्या बुद्धिसम विश्व सगळें ॥
अहर्निश घडूं लागले । ब्रम्हदेव सदोदित ॥१०॥

सनकादि चार पुत्र । जे आत्मरूपीं सदा रत ॥
ते प्रथम उत्पन्न करीत । चतुर्मुख श्री ब्रम्हा ॥११॥

त्या योगें न होत कार्य । मग कोप ये अनिवार्य ॥
अशा समयीं रुद्र होय । विधि ललाटापासून ॥१२॥

उग्र सृष्टि या पासाव । रुद्रा वर दे ब्रम्हदेव ॥
तपश्चर्ये नेमी ठाव । पाठवीत तिकडे त्या ॥१३॥

नंतर विधि शांत होई । पुढील प्रजा उत्पन्न करी ॥
मरीचि अंगिरस अत्रि । ऋतु भृगु पुलस्त्य ॥१४॥

पुलह रुचि दक्ष वसिष्ठ । नारद कर्दम पुत्र होत ।
स्वायंभुव मनु जन्मत । शतरूपा कांतेसह ॥१५॥

अशा प्रकारें आरंभ झाला । विधात्याच्या सृष्टि कार्याला ॥
प्रजापति गढून गेला । कार्यक्रमीं जगताच्या ॥१६॥

विधिआज्ञेनें कर्दम वरी । स्वायंभुवकन्या बरी ॥
जोड शोभे बरवेपरी । देवहूतीकर्दम हा ॥१७॥

त्यांचा कन्या अनसूया । ऋषि अत्रीची होत जाया ॥
ती असे परम औदार्या । निद्रेंत स्वप्नीं जागृतीं ॥१८॥

पित्राज्ञा अत्रि ऋषीला । उत्पन्न करीं प्रजेला ॥
ब्रह्मदेवतपपुतळा । अत्रि ऋषि महाज्ञानी ॥१९॥

विचार करी अत्रि ऋषि । प्रजा निर्माण करावी कैशी ॥
केवळ प्रवृत्ति मार्गांसी । सत्य सुख मुळीं नसे ॥२०॥

सर्व जनांसी सौख्य व्हावें । जीवा मोक्ष-सुख लाभावें ॥
अज्ञानपटल नासावें । प्रवृत्तिमार्गीं राहुनी ॥२१॥

ऐहिक सुख मिळावें । परम तत्त्व जोडावें ॥
उभय मार्ग साधावे । ऐसें पाहिजे मिळविलें ॥२२॥

लोक असंतुष्ट दिसती । शाश्वत सुखा विसरती ॥
अज्ञान मार्गी ते पडती । हें तों इष्ट नसेची ॥२३॥

स्वयें ज्ञानमार्गी राहुनी । लोकां प्रवृत्तीं सुखवुनी ॥
ज्ञानमार्गांत त्यां नेवोनी । रहावें प्रेमें सर्वदा ॥२४॥



सदा असावें ज्ञानमग्न । परी दिसावें कामपूर्ण ॥
सर्वांसी योग्य सोपान । मिळावें सत्वर प्रेमानें ॥२५॥

अैसा कार्यभाग करण्या । योग्य पाहिजे पुत्र जाणा ॥
तो देईल देवराणा । म्हणूनी करूं तपाला ॥२६॥

असा करूनि दृढ निश्चय । तपश्चर्येस ऋषिराय ॥
अनसूयेसह जाय । ऋक्षकुल पर्वतीं ॥२७॥

तेथें तीव्र तपश्चर्या । आरंभिली देव मिळाया ॥
तेणे कळवळे देवराया । म्हणे दर्शन या देऊं ॥२८॥

विश्वकार्यास कारण । सत्त्व रज तम त्रिगुण ॥
विष्णु विधि उमारमण । ऋषिसमोर ठाकले ॥२९॥

ऋषि पाही नेत्र वासून । तवं देव दिसती तीन ॥
आपुल्या वाहनीं बसून । प्रेमभरानें लक्षिती ॥३०॥

ऋषि परम नम्र होऊन । स्वतीतसे त्यांसी अनन्य ॥
अचिंत्य अनंत अतर्क्य धन्य । अद्वितीय देवा तुम्ही ॥३१॥

प्रेमवश तुमची गांठ । हरूनिया भक्तसंकट ॥
जगत्कारणा देवा नीट । दावितां वाट सत्यमया ॥३२॥

सर्वच आपण दिसतां । तुम्हांवीण कांहींच नसतां ॥
मोह होई अमुच्या चित्ता । तव मायेचें हें पटल ॥३३॥

परंतु जे स्मरती तुम्हां । त्यांसी प्रसन्न, ठेवितां प्रेमा ॥
अशा तुम्हां देण्या उपमा । शोधितां मला न सांपडे ॥३४॥

तुमचें चरित्र जे गाती । ते सदा निर्भय असती ॥
त्यांचे तुम्हीच पक्षपाती । मोठे प्रेमळ कृपाळू ॥३५॥

मी एकाचें केलें ध्यान । येथें मूर्ति दिसती तीन ॥
करूनि सुहास्य वदन । यांतील मर्म कळेना ॥३६॥

तरी माझा यांतील कोण । हें सांगाजी कृपा करून ॥
ऐसें प्रार्थी नम्र होऊन । देवां सहर्षे नमीतसे ॥३७॥

मग सांगती देव त्यासी । ज्यासीं तूं नित्य प्रर्थिसी ॥
त्या जगत्कारणरूपासी । आम्ही असतों गुणभेदें ॥३८॥



योग्य पुत्र द्यावा तुजसी । म्हणूनि आलों या ठायासी ॥
जसा कुमार तूं वांछिसी । तसेच आम्ही एकरूप ॥३९॥

उद्धरण्या लोक समस्त । सर्वात्मरूप सर्वसमर्थ ॥
सदा ज्ञानस्वरूपीं रंगत । आम्हीच तव पुत्र होतों ॥४०॥

असें देऊनि आशीर्वचन । देव पावले अंतर्धान ॥
अत्रीच्या पुढ्यांत प्रसन्न । चतुर्भुज दत्त ठकले ॥४१॥

दत्त बोलती ऋषिवरासी । मम अंशभूत तुम्हांसी ॥
पुत्र लाभती निश्चयेंसी । सदा आनंदी असावें ॥४२॥

हें ऐकून आशीर्वचन । ईश्वरासी नमस्कारून ॥
अत्रि अनसूया संतोषून । आश्रमीं येती आनंदें ॥४३॥

देवाचा अवतार मूळ । चतुर्भुज दत्त प्रेमळ ॥
भक्तांचा अक्षय सांभाळ । करी त्यासी न वर्णवे ॥४४॥

प्रभु नाना वेष घेती । त्यांना भावें जे जे भजती ॥
त्या त्या भक्तां सदा रक्षिती । श्री गुरुदत्त प्रेमभरें ॥४५॥

असतां ते स्वरूपीं मग्न । लोकांस तारण्या लागून ॥
नानापरी वेष घेऊन । शोधिती भक्तगणांला ॥४६॥

त्या प्रभुसम प्रेमळ । कोणी काठें नसे दयाळ ॥
अनुभव जाणे भक्तमेळ । सर्वदाही सत्यपणें ॥४७॥

त्यांना असो भावें नमन । आणि वंदूं भक्तजन ॥
धन्य धन्य ते संत सज्जन । अधिकारी पुण्यपुरुष ॥४८॥

सर्व जनांच्या हिता कष्टती । या वसुंधरीं नाना रीती ॥
सर्वांचें हित जे इच्छिती । त्यांना माझें नमन असो ॥४९॥

अशा सर्व संत सज्जनां । येवो माझी नित्य करुणा ॥
नमितों भावें पुन्हां पुन्हां । मला सत्पथ द्यावा हो ॥५०॥

आतां मागील अवधान । ऋषि भार्येसह निघून ॥
आपुल्या आश्रमा येऊन । वर्तती धर्मे आनंदें ॥५१॥

अनसूया अत्रिकांता । पतिव्रता महाख्याता ॥
थोर साध्वी सद्गुणसरिता । सरी कोणीही न पावे ॥५२॥

कोणी अतिथि अभ्यागत । तेथून विमुख न जात ॥
अशी सदा मात गर्जत । चहूंकडेही त्या काळीं ॥५३॥

तीच ही गोष्ट सुरस । सावित्री लक्ष्मी उमेस ॥
नारद सांगती सहर्ष । त्यामुळें देवी रागावल्या ॥५४॥

आम्ही सत्य पतिव्रता । अनसूयेची काय कथा ॥
तिची पातिव्रत्यभंगता । करूं आम्ही नि:संशय ॥५५॥

असें सांगती त्या नारदा । तो म्हणे त्यजावें मदा ॥
असल्या कार्या जय कदा । मिळणार नाहीं मुळींच ॥५६॥

हें तिघीही न मानिती । अनसूया-छळा योजिती ॥
पुन्हां नारदासी सांगती । आम्ही तिचें सत्त्व हरूं ॥५७॥

नारद म्हणे करा विचार । पस्तावा होईल नंतर ॥
म्हणून सोडा अहंकार । असें सांगून ते गेले ॥५८॥

उमा कमला सावित्री । आपल्या पतींना प्रार्थिती ॥
अनसूयेच्या छळाप्रती । करण्या सांगती आग्रहें ॥५९॥

सावित्रीनाथ ब्रह्मदेव । उमाकांत सदाशिव ॥
लक्ष्मीपति विष्णुदेव । विचार करिती पुढील ॥६०॥

योजूनि भावी अभिप्राय । अनसूयासत्त्व हराया ॥
अतिथिवेष घेऊनियां । पातले अत्रि-आश्रमा ॥६१॥

ऋषि नव्हते आश्रमांत । ब्राह्मणवेषें हे अतीत ॥
सांगती अनसूयेप्रत । आपली इच्छा त्या काळी ॥६२॥

तुम्ही इच्छादान देतां । अशी ऐकिली कानीं कथा ॥
इष्ट भोजन देईं आतां । दुरून आलों श्रमून ॥६३॥

सती म्हणे काय वासना । ती सांगावी याच क्षणा ॥
पुरवीन हें सत्य माना । संकोच मनीं न धरावा ॥६४॥

यापरी वदे अत्रिसती । आणि करी स्वागतरीती ॥
तंव ते अतिथि बोलती । इच्छा भोजन सत्वर दे ॥६५॥



तूं अससी फार सुंदर । वासना मनीं अनिवार ॥
पहावें विवस्त्र शरीर । नग्न वाढीं पोटभरी ॥६६॥

हें जर तूं न करशील । तव ब्रीद सर्व जाईल ॥
काय निरोप सत्वर बोल । आम्ही आर्त बहु झालों ॥६७॥

हें विपरीत ऐकोनी । सती चिंता करी मनीं ॥
परी पुण्यबळें करोनी । दिव्य पुरुष हें जाणिलें ॥६८॥

मग सती मनांत म्हणे । मी पतीच्या चरणाविणे ॥
आणिक कदा कोणी नेणे । काय करील खळ काम ॥६९॥

न जावे विमुख अतिथि । हीच माझी शील संपत्ति ॥
पतिचरणीं दृढ आसक्ति । तीच तारील निश्चयें ॥७०॥

यापरी विचार करून । अतिथींस सांगे वचन ॥
वासना तुमची पुरवीन । चिंता नसावी स्वस्थ बसा ॥७१॥

गृहीं सत्वर ठाय घातले । आसनीं अतिथि प्रेमें बसले ।।
सती चिंती पतिपाऊलें । तारो पतीचें तपोबल ॥७२॥

असें म्हणून झाली नग्न । मानी अतिथी बाळें सान ॥
आणि घेऊन गेली अन्न । तवं बाळक पाहिले ॥७३॥

अतिथि तेथें न दिसती । तीन बाळ टाहो फोडिती ॥
स्तनीं त्यांना धरितां सती । क्षीरही निघें हें नवल ॥७४॥

पतिव्रतेचें.स्तनपान । करून धाले देव तीन ॥
तीन देवांचे बाळ तीन । सतीचें पुण्य प्रकटलें ॥७५॥

नंतर ती वस्त्र नेसून । बाळां निजवी गाऊन गान ॥
तिचें महात्म्य धन्य पावन । सार्थक झालें पूर्णपणें ॥७६॥

ही गोष्ट जोंवरी घडे । तों ऋषि येत घराकडे ॥
ऐकून बाळकांचें रडें । आणि गाणें भार्येचें ॥७७॥

म्हणे कोण रडती बाळें । गाणे सुचाया काय झालें ॥
येवोनी घरांत पाहिलें । बाळें पालखीं खिदळती ॥७८॥



त्यांना पाहतां आनंद होत । त्रयमूर्ति देव दिसत ॥
भक्तिभावें नमन करीत । भार्येसह अत्रिमुनी ॥७९॥

पौर्णिमा दुपार मार्गशीर्ष । परमात्मा सम निर्दोष ॥
प्रकटे विश्वास संतोष । वसंत फुलला हर्षानें ॥८०॥

घडती दैवी चमत्कार । सृष्टि प्रसन्न सुंदर ॥
अत्रिआश्रमीं सभोंवार । जिकडे तिकडे शुभ चिन्हें ॥८१॥

प्रेमभरानें कथी सती । सकळ गोष्ट पतीप्रती ॥
ऋषि संतोषले चितीं । रक्षिती बाळां आनंदें ॥८२॥

देव आले नाहीं परत । तिन्ही देवी चिंता करीत ॥
नारदालागीं विचारीत । मात काय ती सांगावी ॥८३॥

ते म्हणती मला नकळे । परी तिकडे तीन बाळें ॥
असती नारद बोलले । विचारावें अनसूये ॥८४॥

देवी झाल्या फार कष्टी । पण पति मिळण्यासाठीं ॥
अत्रिआश्रमा देती भेटी । नारसादह त्या कालीं ॥८५॥

अनसूया त्यांचें स्वागत । करिती झाली यथास्थित ।
मग त्या पति-वार्ता पुसत । सती म्हणाली मी नेणे ॥८६॥

पण पूर्व कथा सांगून । त्यांना दाखवी बाळ तीन ॥
हेच असल्या ओळखून । न्या म्हणे ती तिघींना ॥८७॥

ऐकोनी सतीचें वचन । ओळखूं लागती देवी तीन ॥
परंतु पतींचे लक्षण । त्यांना कांहीं समजेना ॥८८॥

त्या मग प्रार्थिती सतीला । अनसूया स्तवी देवांला ॥
निज स्वरूपी तये वेळा । देव संन्निध ठाकले ॥८९॥

सर्वांनाही आनंद झाला । नारद नाचूं लागला ।
अति गर्वाचा नाश झाला । म्हणून गातसे प्रेमाने ॥९०॥

देवां सोडून नसती देवी । नारद प्रेमें कळ लावी ॥
तिन्ही देव वाणी बरवी । वदती कामना सांगावी ॥९१॥

अत्रि-अनसूया पूजिती । भक्ति-भावें सद्गद होती ॥
हात जोडून हळु सांगती । पाळणा रिता नसावा ॥९२॥

त्रैमूर्ति तथाऽस्तु म्हणती । तुमचे पुत्र बाळ असती ॥
सदा पावाल सुखस्थिती । बाळ चंद्र दत्त दुर्वास ॥९३॥

चंद्र ब्रह्मा चंद्र मंडळीं । हर दुर्वास तपोबळी ॥
योगेश विष्णु तुम्हांजवळी । त्रैमूर्ति दत्त राहील ॥९४॥

देव पावले अंतर्धान । अत्रि-आश्रमीं समाधान ॥
देवादि सिद्ध नित्य येऊन । अविनाश दत्ता वंदिती ॥९५॥

तीन शिरें व सहा हात । बाल सूर्य-प्रभा दिसत ।
माला कमंडलु असत । अध:हस्तीं तयांच्या ॥९६॥

त्रिशूल डमरू मध्य करीं । शंख चक्र वरच्या करीं ॥
सस्मित बाळ अधांतरी । मुकुट तेजस्वी मस्तकीं ॥९७॥

अंगरखा अंगीं हिरवा । जरीकांठी शोभे बरवा ॥
ऋषिमुनीसिद्धमेळावा । जटाधारी संगें असे ॥९८॥

चार वेद श्वान बाजूस । कामधेनूचा निकट वास ॥
मनोहर दत्त भक्तांस । स्वयंप्रकाश मुदें दावी ॥९९॥

त्यांना साष्टांग प्रणिपात । भक्त-कामना पूर्ण होत॥
द्वितीयाध्याय गोड बहुत । अर्पितां दत्त संतोषती ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



# अध्याय ३ रा

श्रीगणेशाय नम: श्रीसरस्वत्यै नम: श्रीसद्गुरवे नम:

उत्तर ध्रुव-परिसरांत । प्रथम वस्ती सूर्य उदित॥
काही काळ बुडे तमात । अत्रीस त्याचें ज्ञान असे ॥१॥

पश्चिमेचा देव वरुण । तोही जाणे कार्यकारण॥
दोघां प्रसन्न सूर्यनारायण। स्वायंभुव मन्वंतरी ॥२॥

प्राचीन कथा वेद वदत। पुढें शंकर विष्णु देत॥
अत्रीस सुत दुर्वास दत्त। सर्वां नमस्कार असो ॥३॥

मणिपुरीं अनंत सूर्य। नर नारी नटे अद्वय॥
आपुली पृथ्वी निर्माण होय। सूर्यमालेंत ग्रहांसह ॥४॥

सूर्य फिरवी भूमातेस। भूगोलाचा कलता आस॥
त्यामुळे ध्रुवपरिसरास। भास्कर गुप्त काळ कांहीं ॥५॥

तसाच ग्रहणचमत्कार। अत्रि सांगत सविस्तर॥
सर्व संतोषले अपार। निरसे भ्रांती तमाची ॥६॥

छाया चंद्र संकर्षकर । तम रज सत्त्व प्रकार॥
पृथ्वीचंद्रासह भास्कर। दावी परिणाम भूगोलीं ॥७॥

मनाचा लिंगदेह टाकून। असूया नाहीं आत्मचिंतन॥
करितां परमात्मादर्शन। सगुण निर्गुण त्रैमूर्ति ॥८॥

पृथ्वी-चंद्रांच्या पलीकडे । जगदात्मा सूर्य उघडे॥
मनोव्यापरापलीकडे। त्रैमूर्ति दत्त परमात्मा ॥९॥

दत्तमुनी त्रिमूर्ति तेजाळ। स्वयंगुरू भक्तवत्सल॥
सनकादि भृगु कपिल। नारद नम्र दत्तपदीं ॥१०॥

अत्रि मुलांच्या मुंजी करी। दुर्वास दत्त लग्न नाकारी॥
अत्रि धाडी त्र्यंबकेश्वरीं। बोधून दत्ता तपा तीर्था ॥११॥

त्रिगुणात्मक त्र्यंबकेश्वर । दत्ता प्रसन्न निरंतर ॥
तमकाळीं देवता इतर । दीप्तिमान जगीं दिसती ॥१२॥



मंत्रांनीं देवता-साधन । शंकराचें दत्ता वचन॥
जगीं नाना विद्या गहन । योगविद्या अमोलिक ॥१३॥

वैवस्वत मन्वंतरांत । लोकरीतीनें पुन्हां सुत॥
अत्रीस चंद्र दुर्वास दत्त । बाळलीला बहु गोड ॥१४॥

सिंहगिरी मातापुरांत । मातापित्या दत्त भेटत॥
सायंकाळीं देवही येत। उत्सव मोठा चालतो ॥१५॥

मणिपुर त्रिगुणें चालतें। परब्रह्म त्या चालवितें॥
अ-त्रिसाधन दिव्य गमतें। सर्वच अेक प्रेमें नमूं ॥१६॥

पूर्वी प्रतिष्ठान पुरांत। कौशिक ब्राह्मण रहात॥
त्याची भार्या होती खचित। पतिव्रता थोर सती ॥१७॥

कुष्ठरोग त्या विप्रास। परी ती न मानी दोष॥
देवासम रात्रंदिवस। सेवा त्याची सर्व करी ॥१८॥

असें असतां द्विज कौशिक। कांतेस छळी अविवेक॥
पत्नीस सांगे गोष्ट अेक। निर्लज्जपणें करोनी ॥१९॥

म्हणे माझें मन वेधलें। वेश्येलागीं आतुर झालें॥
तेथें न्यावें मला पहिलें। नाहीं तरी मरेन मी ॥२०॥

असलें कठीण वचन। परी तेंही मान्य करुन॥
खांद्यावरी त्या घेऊन। ती निघे वेश्यागृहाला ॥२१॥

जरी अंधारी रात्र होती। तरी खुणेनें जातसे ती॥
मांडव्य ऋषि मार्गाप्रती। चोर मानूनि सुळीं असे ॥२२॥

तो भोगी तेथें हाल। त्या लागे विप्रपाऊल ॥
तेणे तो फार विव्हल। शाप वदला त्यावेळीं ॥२३॥

जो मजला दु:ख देत। त्याला मरण होवो प्राप्त॥
सूर्य उदया जेव्हां येत। तेव्हां सत्य नि:संशय ॥२४॥

परिसोनी हें वचन। सतीला खेद दारुण॥
ती वदे प्रतिवचन। सूर्य उदया न यावा ॥२५॥

नंतर वेश्यागृहीं जात। वेश्येसह पति रमत ॥
सती वेश्येला द्रव्य देत। व पतीसह ती ये गृहीं ॥२६॥

सतीचें पुण्य फार थोर। तेणे न उगवे भास्कर ॥
जिकडे तिकडे हाहा:कार। चिंतीं पडती देवही ॥२७॥

अमर गेले विधीकडे। ब्रह्मा म्हणे सतीसांकडें ॥
सतीच निवारी रोकडें। विचार तुम्हां सांगतों ॥२८॥

अत्रिआश्रमा तुम्हीं चला। प्रसन्न करा अनसूयेला ॥
ती आणील रवि उदयाला। भिऊं नकाहो कोणीही ॥२९॥

देव निघाले हें ऐकून। अत्रिअनसूये वर्तमान ॥
सांगती सत्वर येऊन। तींही निघती देवांसह ॥३०॥

कौशिकविप्राघरीं येती। अनसूया सांगे सतीप्रती ॥
सतीही सांगे झाली स्थिती। आणि काय करु म्हणे ॥३१॥

अनसूया म्हणे सतीस। आज झाले दहा दिवस ॥
रवि न आला उदयास। कर्मलोप होतसे ॥३२॥

कर्मलोपपर्यवसान। जग नाश पावेल जाण ॥
तव बोल घ्यावा काढून। सूर्य उदया येऊं दे ॥३३॥

तव पतीचा प्राणनाश। जरी होईल त्या वेळेस ॥
तरी ठेव तूं विश्वास। मजवरी निर्धारें ये काळीं ॥३४॥

जगत अंधारीं बुडालें। त्याचें होऊं दे आधीं भलें ॥
तुला सौभाग्य सत्य मिळे। तरी सूर्या दे आज्ञा ॥३५॥

हे ऐकून म्हणे सती। उदया येईं तूं गभस्ति ॥
तमाची निरसली भ्रांती। सूर्यं उदया पावला ॥३६॥

जग सर्वही आनंदलें। परी अनसूया धीर दे ॥
अत्रिचरणांसी वंदून। प्राण देवतेला प्रार्थून ॥३७॥

अनसूया सत्वर प्राण। घाली कौशिकशरीरीं ॥
कौशिक सजीव झाला। कुष्ठ रोगही पळाला ॥३८॥

सर्वांलागीं आनंद झाला। काय लिहावा तो मोद ॥
पुष्पें वर्षती सुरवर। अप्सरा नृत्य करिती फार ॥३९॥



गंधर्व गाती सुस्वर। अप्सरा नृत्य करिती फार ॥
गंधर्व गाती सुस्वर। होत संतोष चहूंकडे ॥४०॥

देव म्हणती अनसूयेला। आम्हा फार आनंद झाला ॥
माग हवें तें देतों तुला। ती मागे ईशपुत्र ॥४१॥

निर्जर तथास्तु ह्मणती। आणि आपुल्या स्थानीं जाती ॥
कौशिका पुसोनी अत्रि। गेले स्वठाया स्त्रीसह ॥४२॥

राजा सुळीं न कळत। मांडव्य ऋषीस असे देत ॥
क्षमा याचून त्यां सोडीत। ऋषि राजा सुखावले ॥४३॥

अत्रि आपल्या आश्रमांत। समाधानपणें रहात ॥
त्रिगुणात्मक देवा ध्यात। ज्ञानविज्ञानीं पूर्णं जो ॥४४॥

ऋतुकाळीं अत्रि ऋषी। ध्याऊन परमेशासी ॥
अनुभवीत रतिसुखासी। सगर्भ होई अनसूया ॥४५॥

तेणे ती फार शोभली। अंगीं कांति दिव्य चढली ॥
जी परमेशाची माऊली। तिला कोण वर्णील ॥४६॥

दिवसें दिवस गर्भ वाढे। अनसूया आनंदीं चढे ॥
देवराणा आपणा जोडे। ह्मणून अत्रीही संतोषती ॥४७॥

ऋषि करिती गर्भ-संस्कार। होतसे आनंद अपार ॥
सृष्टिदेवीही सुंदर। मुदित होई प्रेमभरें ॥४८॥

पूर्वील वराचें स्मरण। अत्रिअनसूयेस दर्शन ॥
त्रैमूर्ति ऐक्य होऊन। उभे पुढ्यांत अधांतरीं ॥४९॥

तीन गूण एकवटले। ब्रह्मा विष्णु महेश मिळाले ॥
दत्तात्रय दिव्य शोभले। अत्रिवरद अक्षय ॥५०॥

मार्गशीर्ष उत्तम मास। प्रदोष काळीं पौर्णिमेस ॥
वृषभ लग्न तीच रास। बुधवारीं जन्म झाला ॥५१॥

अनसूये वरद सुत। अत्रिपुत्र श्री गुरु दत्त ॥
त्रिगुणी व त्रिगुणातीत। मंगलदायी सुप्रसन्न ॥५२॥

ऋषि करी जात संस्कार। सगळीकडे आनंद थोर ॥
ब्रह्मादिकही देववर। समय तो मोदें पाळिती ॥५३॥



तीन मुलगे तीन वेळ। जन्मले हेही पुराण बोल ॥
अेक वाक्यता अेक मेळ। दत्तात्रेय अत्रिपुत्र ॥५४॥

दुर्वास नामें महेश्वर। दत्त योगेश लक्ष्मीवर ॥
विधिअंश चंद्र सुंदर। दत्तात्रेय सुप्रसन्न ॥५५॥

चंद्रात्रेया वंश लाभला। चंद्रीं चंद्र पुढें मिळाला ॥
दुर्वास तपोनिधि झाला। सर्वत्र फिरे लोकहिता ॥५६॥

विष्णुमूर्ति श्रीदत्तदेव। राही धरूनि ऋषिठाव ॥
लीला करीत वेळ सर्व। आईबापां संतोषवी ॥५७॥

चंद्र दुर्वास आणि दत्त। यांचा मेळ श्री गुरुदेत्त ॥
त्यांना करूया प्रणिपात। नित्य रक्षिती भक्तांसी ॥५८॥

खूप वर्षे तप करोनी। नानापरी कष्ट साहुनी ॥
अत्रि ऋषि महा मुनी। मागती जें देवाकडे ॥५९॥

तें परापर ब्रह्म उदेलें। सर्वांलागीं सौख्य झालें ॥
अत्रिमुनीचें भाग्य मिळालें। सकळांनाही अक्षय ॥६०॥

सर्वभूतहित होण्यासी। करिती तप अत्रि ऋषी ॥
कष्टती लोकसंग्रहासी। अत्रि अनसूया धन्य धन्य ॥६१॥

अनसूया पतिव्रता। परम धार्मिक निश्चिता ॥
तिची थोरवी वर्णितां। सर्वथा नये कोणासी ॥६२॥

ज्योतिषशास्त्रीं गूढ शोध। आणि प्रगटवी आयुर्वेद ॥
दत्तात्रेय सदा सुखद। मिळवी तपें अत्रिऋषि ॥६३॥

जनसुखासाठीं झटती। त्यांना असो भावें प्रणती ॥
त्यांचे गुण न वर्णवती। अत्रिजीवन लोकहिता ॥६४॥

सत्त्व रज तम त्रिगुण। विश्वीं त्यांच्या मूर्ति तीन ॥
विष्णु विधि उमारमण। त्यांची साधना जो करी ॥६५॥

कपिल ऋषि महामुनी। त्यांची बहीण अत्रिरमणी ॥
अनसूया सद्गुणखाणी। श्री दत्ताची जी माता ॥६६॥

अैशा धर्मज्ञ जोडप्यासी। प्रेमें करुया नमनासी ॥
वारंवार त्या नमण्यासी। मन बहु उचंबळतें ॥६७॥

श्रीगुरुदेव दत्त मुनी। अतर्क्य लीला सदा करोनी ॥
सुखविता पिता जननी। ऋषिसतीचे थोर भाग्य ॥६८॥

सदाचारयुक्त जनांस। ज्ञान देऊनि सुखविण्यास ॥
दुष्टां शासन करण्यास। अवतार दत्त झालासे ॥६९॥

ऐसें फाकलें वर्तमान। ऋषिवर येती धावून ॥
दत्तानुग्रह घ्यावा म्हणून। अत्रिआश्रमा प्रेमानें ॥७०॥

परंतु दत्त खेळ करिती। मोठ्या डोहांत दत्त दडती ॥
ऋषिवरांचा भाव पाहाती। आंत राहोनी बहुकाळ ॥७१॥

तरी तेथें जे तिष्ठती। त्यांनाही श्रीदत्त मोहिती ॥
आपल्या मांडीवर ते घेती। स्वमाया कांतारूपानें ॥७२॥

मद्यमांसही स्वीकारुन। बहुत चालविलें गायन ॥
अमंगळ रुप धरुन। परीक्षा घेती दत्तगुरु ॥७३॥

परी तेव्हां ऋषि म्हणती। जे पूर्ण स्वरूपीं असती ॥
त्यांना दोष न लागती। आचारबंध इतरांना ॥७४॥

सर्वरुपांत देव असे। भ्रष्टरुपांत काय नसे ॥
ज्ञानरुपास भेद नसे। श्रीदत्त भाव पहाती ॥७५॥

इतरां आचार दावायाला। ते करिती आचार भला ॥
किती भाव देवीं जडला। तें पहाती अशा रुपीं ॥७६॥

देवाचा दिसे भ्रष्टाचार । तसा आपण वागे जर ॥
तर अमार्गांत पडे नर । तसें कोणीही करूं नये ॥७७॥

यापरी मर्म जाणूनी । ते असती निश्चिंत मनीं ॥
दत्तें भाव ओळखूनी । अनुग्रह केला त्यांवरी ॥७८॥

यासाठी शुद्ध भाव ठेवणें । कवणाचेही नसे भेणें ॥
असें मानावें पूर्णपणें । कधींही नसे असत्य ॥७९॥

असा दत्तगुरु प्रेमळ । भाव पाही सदा निर्मळ ॥
पामरही तरे तत्काळ । अखंड प्रेम दत्त करी ॥८०॥

दत्त देव फार दयाळ । त्याचा अनुभव प्रेमळ ॥
भक्त जाणती सदाकाळ । इतरां कळेल कसें तें ॥८१॥



जो करी त्याचें चिंतन । मात्र दृढ भाव पाहून ।
त्याजवळी तो उभा राहून । अनुभव दावी निश्चयें ॥८२॥

द्वंद्वातीत श्रीगुरुदत्त । तो असे सर्वदा मुक्त ॥
परी रक्षिण्या नित्य भक्त । नाना लीला करीतसे ॥८३॥

स्वयंगुरु दत्त दयाळ । त्रयमूर्तींचा एक मेळ ॥
होऊन राहिला निश्चल । विष्णुअंश अत्रिगेहीं ॥८४॥

जो असे सदा अजन्मा । तो श्रीदत्त घेत जन्मा ॥
अनसूयात्रि-पूर्णकामा । कोण कसा वर्णील ॥८५॥

नाना वेष तो धरीतसे । भक्तगणाला तारीतसे ॥
जशी इच्छा ज्याला असे । त्याचपरी तो सन्मार्गे ॥८६॥

जो सन्मार्ग धरी निश्चित । त्याजवळी देव तिष्ठत ॥
परी अधर्मे रहाटत । त्याला दंडीत श्रीदत्त ॥८७॥

भक्तिभावें भजतां त्याला । तो निवारी सर्व व्यथेला ॥
आणि देतसे सत्य सुखाला । शाश्वत कृपाळू श्रीगुरु ॥८८॥

एकमेव गुरुदेवदत्त । त्यांसी आवडे प्रेमळ भक्त ॥
त्याचें रक्षण दत्त करीत । इहपरलोकीं निर्धारें ॥८९॥

प्रसन्न होई दत्त दयाळ । श्रीगुरुदत्त फार प्रेमळ ॥
भक्ताभिमानी भक्तवत्सल । नसे कोणीही दूसरा ॥९०॥

आपण दावी आपुली खुणा । आणि करी नित्याचरणा ॥
श्रीदत्तकथामृतपाना । करुया प्रत्येक अध्यायीं ॥९१॥

आपण भक्ता संकटीं नेती । तेथून स्वयेंच तारिती ॥
भक्त-महिमा वाढविती । देती सुखही अक्षय ॥९२॥

नानाव्रतें प्रकट करिती । नाना वेषें फळही देती ॥
परंतु ती एकच मूर्ती । हेंच तत्त्व त्यांत असे ॥९३॥

ज्याला जशी रुचि असेल। तशा रूपाला तो भजेल ॥
परंतु सर्व एकच मेळ । तत्त्व मनांत असावें ॥९४॥

मुख्य भाव ठेवणें दृढ । संकटींही न करा सोड ॥
दत्त दयाळा हीच जोड । ठाम ठेव मनीं माझ्या ॥९५॥



अेका देवा भजे आपण । निंदा इतरांची नको अजाण ।
एका ठायीं लावून मन । शुद्ध सात्त्विक वर्तावें ॥९६॥

मी करतों असें मन । जोपर्यंत करी कथन ॥
तोपर्यंत शुद्ध वर्तन । करीत जावें निश्चयें ॥९७॥

आपोआप घडे वर्तन। असें होईल जेव्हां ज्ञान ॥
मग बोधाचें काय कारण । सर्वंच एक परमात्मा ॥९८॥

त्रिविध ताप हराया । आत्मज्ञान पूर्ण व्हाया ॥
भक्तांस नित्य तारावया । दत्तकाया देव धरी ॥९९॥

भक्तां सर्व दत्त सांगत । अनुभव घेती सदा भक्त ॥
तृतीयाध्याय स्वीकारीत । कृपाकटाक्षें दत्तगुरु ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयापर्यणमस्तु

# अध्याय ४ था

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः ॥

विश्व कसें कोणीं निर्मिलें । जीवा नकळे स्वरूप सगळें ॥
चिच्छक्तीनें सर्वही भरलें । शिवशक्ति अेक सर्व ॥१॥

विश्वांत असती नाना योनी । त्या भोगिती विविधप्राणी ॥
लक्षचौऱ्यांअैशीं योनी । फिरतां नरदेह लाभतो ॥२॥

नरदेहांत कळतें ज्ञान । सर्व अेकच श्रीभगवान ॥
त्यासी भजावें मनें अनन्य । मग ज्ञान प्राप्त होतें ॥३॥

भक्तदेहांतून प्राण । जरी अंतीं जात निघून ॥
तरी लिंगशरीरीं ज्ञान । स्थिर अभंग राहतें ॥४॥

लिंगदेहही सोडून । जीव पावे शिव स्थान ॥
परमात्म्यांत होई लीन । हेंच नरजन्म सार्थक ॥५॥

जटाधारी पांडुरवर्ण । शूलहस्ती कृपेची खाण ॥
सर्व रोगांचेंही हरण । करी त्या दत्ता भजतों मी ॥६॥

श्रीदत्तपरमात्मास्मरण । करितां होई दत्त प्रसन्न ॥
एकदां ऋषि भगवान । नारद स्तविती दत्तासी ॥७॥

जगाची उत्पत्ति स्थिती संहार । श्रीदत्त करिती निरंतर ॥
भवपाशामधून पार । होण्या दत्ता नमन असो ॥८॥

जन्म तसेंच वृद्धपण । निवारी दिगंबर दयापूर्ण ॥
देहशुद्धीसाठीं नमन । दत्तात्रेया सदा असो ॥९॥

कर्पूर कांतीचें शरीर । श्रीदत्त ब्रह्ममूर्तिधर ॥
वेद शास्त्र ज्ञानी अमर । दत्तात्रेया नमन असो ॥१०॥

ऱ्हस्व दीर्घ कृश स्थूळ । नाम गोत्राविणें विमल ॥
पंचभूती दिव्य विशाल । दत्तात्रेया नमन असो ॥११॥

यज्ञभोक्ता यज्ञमय । यज्ञरूपी यज्ञप्रिय ॥
सिद्ध एकमेवाद्वितीय । दत्तात्रेया नमन असो ॥१२॥



ब्रह्मा विष्णु सदाशिव । आधीं मध्यें अंतीं देव ॥
मूर्तित्रय गुरुदत्तदेव । दत्तात्रेया नमन असो ॥१३॥

भोगालय आणि भोगी । योगधारी श्रीदत्तयोगी ॥
जितज्ञानी जितेंद्रियांगी । दत्तात्रेया नमन असो ॥१४॥

दिगंबर दिव्य दत्त । दिव्यरूपधारी दत्त ॥
परब्रह्म सदोदित । दत्तात्रेया नमन असो ॥१५॥

जंबुद्वीप महाक्षेत्र । मातापुरनिवासी दत्त ॥
सदाविजयी सत्य दत्त । दत्तात्रेया नमन असो ॥१६॥

सुवर्णपात्र हातीं धरून । गृहीं ग्रामीं भिक्षाटन ॥
नाना स्वादांचें प्रिय भिक्षान्न । दत्तात्रेया नमन असो ॥१७॥

दत्तमुद्रा ब्रह्मज्ञान । दावी भूमि आकाशवसन ॥
प्रज्ञानघन बोधस्थान । दत्तात्रेया नमन असो ॥१८॥

सदानंद दत्तावधूत । परब्रह्मस्वरूपी दत्त ॥
विदेही वा देही दत्त । दत्तात्रेया नमन असो ॥१९॥

सत्यरूप सदाचरण । सत्यधर्मपरायण ॥
सत्याश्रय परोक्षज्ञान । दत्तात्रेया नमन असो ॥२०॥

शूलहस्ती गदाधर । वनमाळा सुकंधर ॥
ब्राह्मण यज्ञसूत्रधार । दत्तात्रेया नमन असो ॥२१॥

क्षराक्षरस्वरूपी दत्त । परात्परतरहि दत्त ॥
दत्तमुक्तिदायक स्तोत्र । दत्तात्रेया नमन असो ॥२२॥

दत्त विद्याढ्य लक्ष्मीश । स्वात्मस्वरूपी दत्त विशेष ॥
सगुण वा निर्गुण वेष । दत्तात्रेया नमन असो ॥२३॥

शत्रुनाशकर हे स्तोत्र । ज्ञानविज्ञानदायक स्तोत्र ॥
सर्व पापशामक स्तोत्र । दत्तात्रेया नमन असो ॥२४॥

हें स्तोत्र दिव्य महान । करी दत्तात्रेयदर्शन ।
दत्तात्रेयप्रसादपूर्ण । नारद मुनींनीं रचिलेंसे ॥२५॥



जगाचें कार्य करिती त्रिगुण । तेच दत्तात्रेय भगवान ॥
अत्रिगृहीं अवतरून । लीला सदा दाविती ॥२६॥

योगी श्रीदत्तावधूत । आत्मानंदीं सदा रत ॥
दलादन दत्ता स्तवीत । दत्तलहरी स्तोत्रानें ॥२७॥

दत्तशिष्य संस्कृति थोर । श्रीदत्तांचा कृपाळू कर ॥
लाभून जाहले भवपार । अनंत भक्त आजवरी ॥२८॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥२९॥

एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तन्नमामि ॥३०॥

देवच नाना रूपें घेई । आणि जगाचें कार्य चालवी ॥
त्याची क्रीडा-वृत्ति बरवी । कोण कसा जाणील ॥३१॥

सर्व सत्ता देवाजीची । त्याला अपेक्षा नसे कशाची ॥
त्याचे चरणीं बुद्धि आमुची । असणें हीच गुरुकृपा ॥३२॥

जळीं स्थळीं काष्ठिपाषाणीं । ग्रहताऱ्यांसह गगनीं ॥
तोच भरला त्याचे चरणीं । कोण काय अर्पिणार ॥३३॥

परी भक्त प्रेमळपणीं । पान, फूल, फळ वा पाणी ॥
अर्पण करी त्यासी मानी । पुष्कळ असें भगवंत ॥३४॥

कालगतीचें गणन । ब्रह्मदेवाचा एक दिन ॥
सहस्त्रयुग हें प्रमाण । तेवढीच रात्र असे ॥३५॥

चौदा मनु एका दिनांत । मानवी वर्ष महायुग होत ॥
सहा सहामास दिनरात्र । महायुग हें देवतांचें ॥३६॥

सहस्त्रयुगें चौदा मनूंत । अेकाहत्तर एका मनूंत ॥
चार युगें संधि सहित । अेका मनूंत जाणावीं ॥३७॥

कृत त्रेता द्वापार कलि । बारा हजार वर्षे झालीं ॥
पट तीनशें साठ केली । असेंही प्रमाण मानिती ॥३८॥

स्वायंभुव आदि मन्वंतर । सप्तर्षीरत असती दत्त ॥
उत्तम तामस रैवत । तृतीय चतुर्थ पंचम ॥३९॥

स्वारोचिष मन्वंतरांत । सप्तर्षींत असती दत्त ॥
उत्तम तामस रैवत । तृतीय चतुर्थ पंचम ॥४०॥

चाक्षुष वैवस्वत सावर्णि । दक्षसावर्णि ब्रह्मसावर्णि ॥
धर्मसावर्णि रुद्रसावर्णि । देवसावर्णि इंद्रसावर्णि ॥४१॥

प्रथम मनु स्वायंभुव । अंतीं करी परमेशस्तव ॥
विश्वा चेतना देत जो देव । तो लोकांस समजेना ॥४२॥

सर्व सचेतन अचेतन । ईश्वरानें व्यापिलें पूर्ण ॥
त्यानें दिलें तें संतुष्टमन । ठेवून सदा भोगावें ॥४३॥

नको आपणां परधन । ईश्वर करी निरीक्षण ॥
सदा त्याचें करावें स्तवन । सर्वज्ञानी तो असे ॥४४॥

हें विश्व ज्याचें रूप असत । तो जन्मादि विकाररहित ॥
काळत्रयींही अबाधित । स्वयंप्रकाश अनादि ॥४५॥

उत्पत्ति स्थिति संहार । माया करिते निरंतर ॥
ज्ञानें तृप्त निरिच्छईश्वर । कर्मरहित तो असे ॥४६॥

निष्काम कर्म करून । मानवा मिळे आत्मज्ञान ॥
नैष्कर्म्यवृत्ति प्राप्त होऊन । दु:ख संपून सुख लाभे ॥४७॥

मनुष्यरूपी अवतार । घेऊन वागे निरंतर ॥
त्याला अनुसरून नर । श्रद्धाभक्तीनें तरतील ॥४८॥

जो ज्ञानी अहंकाररहित । परिपूर्ण निष्काम स्वतंत्र ॥
त्या परमात्म्या शरण जात । मनु झालासे तल्लीन ॥४९॥

परमात्मा सदा संतुष्ट । भक्त करिती त्याला तुष्ट ॥
त्यांचें रक्षण तोच स्पष्ट । जगीं करून दाखवी ॥५०॥

ब्रह्मा करी जग निर्माण । भगवंत येईल अवतरून ॥
सनत्कुमार सनक सनातन । सनंदन हे बालमूर्ती ॥५१॥



तेज: पुंज आत्मतृप्त । लोककल्याणा सदा फिरत ॥
लोकधारणा सांभाळीत । त्यांना नमस्कार असो ॥५२॥

एकदां ते सनकादिमुनी । जाती श्रीवैकुंठभुवनीं ॥
तेथें अडविती त्यांलागोनी । जय विजय द्वारपाळ ॥५३॥

त्याकारणें ते क्रोधावले । राक्षस व्हा शाप वदले ॥
विष्णु वेगें तेथें आले । सांत्वन केलें मुनींचें ॥५४॥

सनकादिक संतोषीनी । वदती मग उ:शापवाणी ॥
तीन जन्म तुम्ही भोगूनी । परत येथें याल हो ॥५५॥

श्री भगवंतांचें दर्शन । घेऊन गेले मुनी निघून ॥
श्री विष्णूस नमस्कारून । जन्म घेती जय विजय ॥५६॥

दिती नाम कश्यपकांता । संध्याकाळी प्रार्थी नाथा ॥
तो हणे ही वेळ सर्वथा । भोगा इष्ट नव्हे प्रिये ॥५७॥

परी ती फारच कामातुर । पतीसी प्रार्थी वारंवार ॥
विप्रतिकार्या नंतर । करी मनीं नसतांही ॥५८॥

दिती अनुताप पावत । पतीची ती क्षमा याचीत ॥
कश्यप वदे तव सुत । वैकुंठलोकीं जातील ॥५९॥

नातू होईल विष्णुभक्त । तेणें दिती आनंदभरित ॥
म्हणे होती पुत्र उन्मत्त । परी अंतीं शुभ घडे ॥६०॥

अयुक्तकाळीं कामतृप्ति । ह्मणून राक्षस पुत्रप्राप्ति ॥
दोन सुत तिजला होती । हिरण्यकशिपु हिरण्याक्ष ॥६१॥

ते आचरती तप तीव्र । ब्रह्मदेव देतसे वर ॥
तेणे बनले उन्मत फार । जिंकिती तिन्ही लोक ते ॥६२॥

पीडा करिती अनिवार । तेणें त्रासले देव नर ॥
ईणा स्तविती वारंवार । धांव पावगा भगवंता ॥६३॥

हिरण्याक्ष मातला फार । श्री विष्णु घेती अवतार ॥
वराहरूप उग्र फार । जलमग्न भू तारिली ॥६४॥



हिरण्याक्ष ठार केला । हिरण्यकशिपु कोपला ॥
कडक अंमल चालविला । तीव्र तपा आचरी ॥६५॥

ब्रह्मदेवाने दिला वर । तेणे उन्मत्त भयंकर ॥
दैत्य म्हणे आहें अमर । भीती नाहीं कवणाची ॥६६॥

पशु मनुष्य किंवा देव । काहींही सजीव निर्जीव ॥
असमर्थ घेण्या मम जीव । अंतर्बाह्य दिवा निशीं ॥६७॥

असा मिळाला त्याला वर । दैत्यवासना दुष्ट फार ॥
तपश्चर्याकाळीं अमर । बळवंत होते जाहले ॥६८॥

एके दिवशीं इंद्रावें । दैत्यपत्नी कयाधू नांवें ॥
प्रसंगीं धरिली स्वभावें । आणि वधाया सज्जला ॥६९॥

परी नारद अकस्मात । वेगें वेगें तेथें येत ॥
इंद्रास सांगे सर्व मात । ह्मणे वधूं नको हिला ॥७०॥

आधींच ही स्त्री असत । तशांत पोटीं गर्भ वसत ॥
तो होईल श्रीविष्णुभक्त । प्रल्हाद नामें पुत्र भला ॥७१॥

तुमचाच तो पक्षपाती । देवेंद्रा होई, नको धास्ती ॥
हें ऐकतां इंद्र चित्तीं । संतोषून सोडी तिला ॥७२॥

पुढें प्रल्हाद जन्मा आला । झाला नारदशिष्य भला ॥
दैत्यबाळांमध्ये लागला । विष्णुभक्ति पसराया ॥७३॥

हिरण्यकशिपू राज्यीं आला । त्रैलोक्यीं सम्राट बनला ॥
संतसज्जना छळूं लागला । ते प्रार्थिती विष्णूसी ॥७४॥

शुक्र गुरूचा पुत्र त्याला । शिकवी परी विष्णुलीला ॥
प्रल्हाद गाई सदाकाळा । निर्भयानें दैत्यपुत्रीं ॥७५॥

हिरण्यकशिपु ही मात । ऐकतां होतसे दु:खित ॥
वैरियाचा गजर येथ । आपुलाच पुत्र करी ॥७६॥

मग तो पुत्रा मारण्यास । योजी युक्त्या बहुवस ॥
हिरण्यकशिपू राक्षस । पुत्रा छळी निर्दयपणें ॥७७॥

स्वपुत्रा जो यापरि करी । तो इतरां काय न करी ॥
याची कल्पना करा खरी । लिहितां चित्त भंगतें ॥७८॥

कडेलोट त्याचा करवी । पुत्रा तप्त तैलीं तळवी ॥
विषपान कराया लावी । परी त्या रक्षी गोविंद ॥७९॥

त्याला अणुही नसे इजा । मग विचारी दैत्य राजा ॥
पोरा तुला रक्षिता दुजा । कोण आतां पाहतों मी ॥८०॥

तव देव कोठें असे । या स्तंभींही कीं वसे ॥
प्रल्हाद हो म्हणतसे । ताडी स्तंभा तो लत्ता ॥८१॥

आवाज भयंकर झाला । श्री नरसिंह प्रगटला ॥
दैत्यावरी पडला घाला । तुंबळ युद्ध होतसे ॥८२॥

निशा - समय संध्याकाळ । नरसिंह उग्र विक्राळ ॥
दारीं बसे राक्षस-काळ । मांडीवरी घे दैत्या ॥८३॥

आपल्या तीक्ष्ण नखांनीं । दैत्यआंतडीं काढोनी ॥
माळेपरी गळां घालोनी । हिरण्य-कशिपु मारिला ॥८४॥

सांभाळला विधीचा वर । आणि दानवा करी ठार ॥
सदा घेई भक्त-कैवार । वैकुंठनाथ श्रीविष्णू ॥८५॥

नरदेह केसरी-मुख । हा अवतार अलौकिक ॥
सर्व स्तविती देवादिक । परी कोप न आंवरे ॥८६॥

भक्त प्रह्लाद प्रेमळपणें । देवास आळवी सुमनें ॥
उग्र नरसिंह शांतपणें । प्रेमें कुरवाळी तयाला ॥८७॥

आणि देई आशीर्वचन । देवांसही संतोषवून ॥
ज्याचें त्याला राज्य । देऊन सुखी करी सर्वांना ॥८८॥

जय विजय प्रथम जन्म । भगवंत संपवी जाण ॥
घेऊन अवतार दोन । त्यांना नमस्कार असो ॥८९॥

जसा प्रसंग येतसे । तसा अवतार होतसे ॥
भक्तवत्सल तारीतसे । भक्तां निर्भय अक्षय ॥९०॥

भगवंत भक्ताभिमानी । भक्त-वत्सल भक्तधामी ॥
सदा रंगती भक्तकामीं । भवपार करी भक्ता ॥९१॥

नारद-बोध प्रह्लादासी । राज्य करितांही विष्णूसी ॥
भजत असतां देव त्यासी । दावी जीवन्मुक्तता ॥९२॥

प्रह्लाद भक्त एके दिनीं । असे कावेरीतटीं रानीं ॥
सह्याद्रीं दिसे संतुष्ट मौनी । अवधूत मूर्ति आडवी ॥९३॥

गूढ तेजस्वी दिसतसे । भूप-तर्क चालत नसे ॥
अति नम्रत्वें वंदीतसे । भक्त प्रह्लाद तयासी ॥९४॥

आणि म्हणे महाराज । दिसतसां पुष्ट विराज ॥
चिंताभीतीचाही रज । आपुल्या नाहीं अंतरीं ॥९५॥

अंगावर धूळ दिसत । परी आपण अत्यंत शांत ॥
याचा अभिप्राय जाणत । कोणीही नाहीं दूसरा ॥९६॥

तरी सांगावें याचें वर्म । जरी असे गूढ परम ॥
दत्तावधूत भक्त-काम । जाणून सांगूं लागले ॥९७॥

दत्त दयाळु भगवंत । परमहंस-धर्मीं रहात ॥
असुर-राजा प्रह्लाद भक्त । भगवंतास आवडे ॥९८॥

देव मानव दानव । किंवा अन्य योनींत जीव ॥
ज्याच्या ठायीं दृढ भक्तिभाव । तेथें परमेश तिष्ठतो ॥९९॥

मायेनें झांकिलें ब्रह्म । त्याकडे लागो आमुचें मन ॥
दत्त दयाळु भगवान । वागवो आम्हां प्रेमभरें ॥१००॥

द्यावी सदा तुमची भक्ति । कोप धरूं नका चित्तीं ॥
सांभाळ करा कृपाहस्तीं । चतुर्थाध्याय तवार्पण १००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु

# अध्याय ५ वा.

श्रीगणेशाय नम: । श्रीसरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:

षड्गुणैश्वर्यसंपन्न । श्रीदत्तात्रेय भगवान ॥
अत्यंत सुप्रसन्न होऊन । भक्त प्रल्हादा सांगती ॥१॥

जन्ममरणाच्या फेऱ्यांत । पडून मानवजन्म प्राप्त ॥
लोकउद्योग होती व्यर्थ । तेणें विचारा लागलों ॥२॥

सर्व दिसतें अशाश्वत । स्थिर कांहीं नसे राहात ॥
एक एकाचा मी गूण घेत । त्याला त्याला गुरु केला ॥३॥

अजगराचा घेतला गुण । तो राहातो स्थिर पडून ॥
सहज मिळें तें खाऊन । किंवा उपाशीं सुखी असे ॥४॥

तसें करितों मी वर्तन । मधमाशीचा घेतला गुण ॥
मधु जमवी परंतु अन्य । नेतसे मधुती कष्टी ॥५॥

कष्ट होऊं नये म्हणून । विरक्तता धरिली जाण ॥
असे खूप गुरु करून । वसतों सदा निर्भय ॥६॥

मजला आहे पूर्ण शांती । आचरणाच्या नाना रीती ॥
एकच परमात्म्याची ज्योती । तेथें अन्य काय असे ॥७॥

कधीं असतों मी उपाशीं । कधीं खातसें बहुवशीं ॥
सहज मिळे तें अहर्निशीं । क्रोधे प्रेमे कसेंही ॥८॥

नानापरीचीं वस्त्रें लेतों । किंवा दिगंबर राहातों ॥
रथीं गजीं अश्वीं बसतों । अथवा पायीं हिंडत ॥९॥

कधीं ऋषिसम आचार । कधीं अडाणी अनाचार ॥
असा राहातों निरंतर । ऐक भक्ता प्रल्हादा ॥१०॥

निंदा स्तुति नाहीं करीत । सर्वकल्याण सदा इच्छीत ॥
ईशचिंतन जन करोत । हीच वासना बा माझी ॥११॥

ब्रम्हमय सर्वदा असें । त्यामुळें समान सर्व दिसे ॥
वृक्ष श्वान कीटक तसे । ब्राम्हण गाय चांडालादि ॥१२॥

वासना सोडून आत्मसाधन । करितां झालें समाधान ॥
सर्वदा आत्मरूपीं राहून । बा प्रल्हादा वर्ततसें ॥१३॥

हें अैकतां बोधवचन । जाणी राजा हे भगवान ॥
वारंवार त्यांस नमून । भक्तिभावें स्तवीतसे ॥१४॥

नंतर दत्त अवधूतें । उपदेशूनि प्रल्हादातें ॥
पाठवी आपुल्या राज्यातें । भक्तालागीं मोदभरें ॥१५॥

ईश्वरभक्ति त्यानें केली । दृढचित्तानें सर्व काळीं ॥
एकनिष्ठेनें देवमाउली । स्तंभीही जाणा प्रकटली ॥१६॥

परमहंसआचरण । योग्य वेळीं त्यास दावून ॥
आत्मज्ञानें संतोषवून । निःशंक त्यासी केलासे ॥१७॥

शेवाळें झांकिलें पाणी । तें आम्ही दूर लोटोनी ॥
मृगजळापाठीं लागोनी । जात असतों अमार्गी ॥१८॥

स्थूल भौतिक हें शरीर । त्यांत सूक्ष्म लिंगशरीर ॥
अंगुष्ठमात्र निरंतर । मनोमय तें जाणावें ॥१९॥

जागृतीं स्वप्नीं सुषुप्तींत । सदा मनाचें कार्य चालत ॥
जन्ममरण त्यामुळें घडत । म्हणून मनीं ईश हवा ॥२०॥

लिंगदेहीं कारणशरीर । प्रकृति महत्तत्वधीहंकार ॥
त्याच्या आंत चौथें शरीर । महाकारण राहातें ॥२१॥

जीव शिव त्यांत वसती । त्याच्या पलीकडे करी वस्ती ॥
एकच परमात्म्याची ज्योती । तेच श्रीदत्त भगवान ॥२२॥

सर्व अैश्वर्य धर्म यश । संपत्ति ज्ञान वैराग्य विशेष ॥
या सहा गुणांचा स्वामि ईश । त्याला भगवंत बोलती ॥२३॥

जगाची उत्पत्ति स्थिति प्रलय । कोठून होतसे जगत्कार्य ॥
जगाचें पुढें होणार काय । ज्ञान अज्ञान कोणतें ॥२४॥

हें ज्याला पूर्ण कळत । त्याला म्हणती श्री भगवंत ॥
तोच देव दयाळु दत्त । भक्तांस सर्वदा रक्षितो ॥२५॥



नारद देवाचा अवतार । गर्भांत बोधिलें ज्ञान अमर ॥
तोच प्रल्हाद शिष्य असुर। थोर भाग्य त्याचें असे ॥२६॥

नारद प्रल्हाद नृसिंहदत्त । त्यांची लीला तेच जाणत ॥
त्यांना असो नित्य प्रणिपात । श्रीदत्तकृपा होईल ॥२७॥

गजेंद्रमोक्षाचें आख्यान । दावी भक्तीचें अवसान ॥
दुष्ट स्वप्नांचें निरसन । होऊन पातकें नष्टती ॥२८॥

ईशभक्ताचा नाहीं नाश । सदा चित्तांत परमेश ॥
अन्य योनींतही विशेष । देवाची कृपा होतसे ॥२९॥

तामस मन्वंतरांत । गजेंद्रतारक भगवंत ॥
श्रीहरी अवतार होत । त्यांसी नमन प्रेमभरें ॥३०॥

षड्गुणैश्वर्य संपन्न । भक्तवत्सल श्रीभगवान ॥
जो करी त्याचें स्मरण । त्याचें रक्षण तोच करी ॥३१॥

पांड्य देशाचा नृपति । करी भगवंताची भक्ति ॥
त्याकडे येती ऋषि अगस्ति । परी तो दंग भक्तींत ॥३२॥

नृपतीकडून स्वागत । तेव्हां न होतसे यथास्थित ॥
राजधर्मासी राजा चुकत । ऋषींनी त्यासी शापिलें ॥३३॥

गजासम उन्मत्त दिससी । तरी पाव तूं गजयोनीसी ॥
राजा गेला त्या योनीसी । गजेंद्र बनला भूपाळ ॥३४॥

आपुल्या कळपास घेऊन । एकदां करी सरोवरीं स्नान ॥
पत्नी मुलांसह खेळून । क्रीडा करी तो जलाशयीं ॥३५॥

इतक्यांत नक्र येऊन । धरी गजेंद्राचा चरण ॥
दीर्घकाळ युद्ध होऊन । गजेन्द्र गलित जाहला ॥३६॥

भार्या मुलें गज इतर । करिती भीतीनें चीत्कार ॥
त्यांचें सहाय्य तसूभर । सुद्धां तेव्हां न होतसे ॥३७॥

पूर्व जन्मीं विष्णुपूजन । गजयोनींतही राखी ज्ञान ॥
अंतकालीं करी स्तवन । धांव पावगा श्रीहरी ॥३८॥



माझा उपाय हरला । पावगा आतां जगत्पाला ॥
परमात्म्या नमन तुजला । येऊंदे करुणा दीनाची ॥३९॥

नको नांव रूप गुण । जगाचा धनी जो असेल कोण ॥
त्याला माझें असो नमन । ध्यान लागलें विष्णूचें ॥४०॥

गरुडास मागें टाकून । धांवून आला नारायण ॥
शुंडाग्रानें कमल फेकून । देवा गजेंद्र नमस्कारी ॥४१॥

गजेंद्रनक्रां पाण्यांतून । बाहेर काढी श्रीभगवान ॥
सुदर्शन करी गतप्राण । नक्रास परि तो उद्धरे ॥४२॥

दिव्यरूप झालें प्राप्त । देवा प्रदक्षिणा करीत ॥
गंधर्व झाला शापमुक्त । गेला आनंदें स्वस्थलीं ॥४३॥

गजेंद्र विष्णुसम होऊन । भगवंतासह करी गमन ॥
वैकुंठलोकीं गरुडवाहन । श्रीहरी मुक्ति देतसे ॥४४॥

सर्व कांहीं श्रीभगवान । असें स्थिर चित्त करून ॥
सदा वागती भक्तजन । त्यांना भगवान तारितो ॥४५॥

वेद वैनतेय बनून । होती भगवंत-वाहन ॥
श्रीविष्णु गरुडवाहन । राहाती सन्निध भक्तांचे ॥४६॥

पाप शाप दुःख मरण । त्यांतून तारी श्री भगवान ॥
सुखानें देतसे मोक्षस्थान । अगाध कृपा विष्णूची ॥४७॥

गजेंद्र-मोक्ष वाचन श्रवण । निवारी पीडाही दारुण ॥
भक्तवत्सल श्री भगवान । सदा रक्षितो भक्तांसी ॥४८॥

भगवंताचें आशीर्वचन । परम पवित्र हें आख्यान ॥
गजेन्द्रमोक्षाचें मनन । करी जवळ भगवंता ॥४९॥

विधिअंश चंद्र होऊन । चन्द्रवंश करी उत्पन्न ॥
गगनांत गुरुपत्नी म्हणून । रोहिणी तारका विराजे ॥५०॥

ती पुढें चंद्रमार्गांत। येऊन चंद्रपिधान होत ॥
बुधग्रह दिसूं लागत। सत्पर्षिखालच्या प्रदेशीं ॥५१॥

ध्रुवमंडळ प्रदेशांत । बुधाचा असे सदाच अस्त ॥
नानाघटना ज्या गगनांत । त्यातील पुराणीं कांहीं कथा ॥५२॥
ग्रह व तारकांपासून । पृथ्वीवर येती किरण॥
त्यांचें करितां सूक्ष्मसाधन । विविध कार्यें घडताती ॥५३॥
चाक्षुष मन्वंतरांत । कश्यपपुत्र देव-दैत्य ॥
प्राप्त करण्यास अमृत । करिती समुद्रमंथन ॥५४॥
एकदां मुनी दुर्वास जात । विष्णुदर्शना वैकुंठांत ॥
तेथें त्यांना भगवंत देत । पारिजातक सुपुष्प ॥५५॥
तो प्रसाद मुनी घेऊन । आले स्वर्गांत सुप्रसन्न ॥
इंद्र करी मुनिपूजन । दुर्वास प्रसन्न जाहले ॥५६॥
लक्ष्मी-पुष्प दिलें इंद्रास । परी महत्त्व न वाटे त्यास ॥
कोपले इंद्रावर दुर्वास । पाहून उन्मत्तवर्तन ॥५७॥
ऐरावतास दिलें फूल । गजेंद्र-लक्ष्मी झाला मेळ ॥
दुर्वासाचा शाप सबळ । म्हणे निष्प्रभ होशील ॥५८॥
आणि गेले ऋषि निघून । स्वर्ग-रत्नें सागरीं पडून ॥
दैत्यांस मिळे स्वर्गस्थान । अमर कंगाल जाहले ॥५९॥
स्वर्ग-लक्ष्मी प्राप्त होण्यास । देव करिती यत्न विशेष ॥
परी पदरीं पडे अपयश । सर्व सचिंत जाहले ॥६०॥
मग जाती ब्रह्मसभेंत । ब्रह्मदेवा प्रणाम करीत ॥
आणि सांगती सर्व वृत्तांत । विधि स्मरे पुरुषोत्तमा ॥६१॥
नाहीं परमात्मा पक्षपाती । परी जगताची उत्पत्ती ॥
वगैरे चालण्या जगत्-स्थिती । आश्रय करी त्रिगुणांचा ॥६२॥
जगताचें स्थैर्यरक्षण । करून प्राण्यांचें कल्याण ॥
करी श्रीविष्णु नारायण । त्यालाच शरण रिघावें ॥६३॥
असा योग्य विचार करून । देवांस घेऊन करी गमन ॥
क्षीरसमुद्राकडे जाऊन । अजित विष्णूला स्तवीतसे ॥६४॥



परमात्मा विष्णु अजित । अंधारापलीकडे वसत ॥
त्याकडे लावून ऐकाग्रचित्त । शरण गेले अनन्य ते ॥६५॥
सहस्र सूर्यांचा व्हावा उदय । तसा प्रकटे अजित अद्वय ॥
दु:खहर्ता भगवंत निर्भय । करी शरणागतांसी ॥६६॥
देवांचे नेत्र जाती दिपून । परी विधिहर तेजामधून ॥
अजिताचें अवलोकन । करिती स्वानंद स्थितींत ॥६७॥
पाचेसारखा श्यामवर्ण । नेत्र कोमल आरक्तवर्ण ॥
रेशमाचें पीतवसन । सुवर्णासम झळकतसे ॥६८॥
सुंदर भ्रुकुटी प्रसन्नवदन । मस्तकीं मुकुट रत्नपूर्ण ॥
कानीं कुंडलें प्रकाशमान । मनोहर मूर्ति विराजे ॥६९॥
बाहुभूषणें शोभिवंत । कमरपट्टा कमरेंत ॥
कडीं तोड्यांनी सजले हस्त । कंठीं हार मिरवतसे ॥७०॥
कौस्तुभमणि वनमाला । वक्ष:स्थलावर कमला ॥
पायीं नूपुरें विष्णु शोभला । चक्रादि आयुधें सतेज ॥७१॥
स्तविती विधिशंकर निर्जर । करिती साष्टांग नमस्कार ॥
सुखी होण्यास आम्ही अमर । दयाळा उपाय सांगावा ॥७२॥
देवाधिपति संतोषून । गंभीर वाणीने आश्वासन ॥
देऊन म्हणे समुद्रमंथन । करून अमृत मिळवावें ॥७३॥
दैत्यांशी जोडा मित्रभाव । त्यांना अनुकूल आहे दैव ॥
प्रसंगीं आपल्या हितास्तव । सख्य दैत्यांशीं करावें ॥७४॥
लता औषधी वेली गवत । आधीं घाला क्षीर सागरात ॥
रवी म्हणून मंदर पर्वत । वासुकि रज्जु करावा ॥७५॥
दैत्य जें जें सांगतील । तें तें मान्य करा सकळ ॥
माझें सहाय्य तुम्हां राहील । भगवंत गुप्त जाहले ॥७६॥
भगवानांस नमस्कारून । विधाताहर गेले निघून ॥
इंद्रादि करिती मन । दैत्यराज बलीकडे ॥७७॥



बलिराजास इंद्र सांगत । स्वर्गरत्नें सागरीं पडत ॥
साह्यास आहे विष्णू अजित । तुम्ही आम्ही काढुया तीं ॥७८॥
रवी करूं मंदर पर्वत । दोरी बनवूं वासुकींप्रत ॥
होईल आम्हां अमृत प्राप्त । समुद्र-मंथन करून ॥७९॥
संतोषले देव असुर । आणिती पर्वत मंदर ॥
दोरी होण्यास सुरासुर । वासुकीला गौरविती ॥८०॥
मुखाकडे धरिती देव । म्हणून कोपती दानव ॥
मग मुख सोडिती देव । आणि धरिती शेंपटी ॥८१॥
आत्मघातकी ते असुर । मुखाकडे धरिती सत्वर ॥
घुसळूं लागती सागर । पर्वत बुडूं लागला ॥८२॥
तेव्हां ते विष्णूस स्तविती । विष्णु कांसवरूप धरिती ॥
पाठीवर पर्वता घेती । देव दानव आनंदले ॥८३॥
मंथना आरंभ जाहला । वासुकी ओकिती विषाला ॥
कांहीं असुरां मृत्यु आला । इतर झाले खिन्न मनीं ॥८४॥
अमर मात्र आनंदले । शेपटी धरून बचावले ॥
मंथन होऊन त्यावेळे । चतुर्दश रत्नें लाभलीं ॥८५॥
विष घेण्यास सर्व कष्टी । तें लोकहित करण्यासाठीं ॥
दयाळु शिव धरिती कंठीं । चंद्रही घेती महेश्वर ॥८६॥
उच्चै:श्रवाश्व धन्वंतरी । कल्पवृक्ष अप्सरा सुंदरी ॥
कामधेनु ऐरावतकरी । वांटून घेती रविइंद्र ॥८७॥
शार्ङ्ग धनुष्य कौस्तुभमणी । पांचजन्य लक्ष्मी गुणी ॥
स्वीकारी श्रीभगवंतधनी । सुरा अमृत राहिलीं ॥८८॥
दैत्यांनीं अमृत लांबविलें । मोहिनीरूप प्रकटलें ॥
दैत्यांचें मन गोंधळलें । म्हणती कामिनी ही हवी ॥८९॥
तिच्याशीं बोलती बोलगोड । ती म्हणे टाका तुम्ही हें वेड ॥
ते म्हणती आमुची सोड । करूं नको गे प्रेमळे ॥९०॥

ती म्हणे मजवरी विश्वास । टाकूं नका हो या वेळेस ॥
ते म्हणती अमृतकलश । इच्छेसमान वांटून दे ॥९१॥
मोहिनी म्हणे धरा पंगत । रांगा करिती देव दैत्य ॥
देवांस वाढी ती अमृत । मध्येंच राहु दिसतसे ॥९२॥
विष्णूचें चक्र सुदर्शन । मोहिनीचे करीं येऊन ॥
राहुशिर धडापासून । वेगळें करी ती तत्क्षणीं ॥९३॥
अमृतप्राशनें राहु जिवंत । शिर रूपानें असे राहत ॥
त्याचे धडाला केतू म्हणत । मोहिनी असे श्रीविष्णू ॥९४॥
असुरांना सुरा दिधली । अमृतप्राशनें देव मंडळी ॥
सुखी होऊन स्थिरावली । स्वर्गलोकीं विष्णुकृपें ॥९५॥
कश्यपाची कांता अदिती । तिची असे देव संतती ॥
कश्यपकांता नांव दिती । तिचे पुत्र असुर दैत्य ॥९६॥
दोघांनाही राज्यें स्वतंत्र । तें अमान्य दैत्य करीत ॥
त्यामुळें त्यांची फसगत । भगवंत करी भासतसे ॥९७॥
दुसऱ्याच्या भागाची हांव । अवनतीस ने सदैव ॥
ईश्वराशीं जडवून भाव । सुखी असावें स्वराज्यीं ॥९८॥
सर्वांचा मातापिता देव । त्यावरी हवा भाव सदैव ॥
देवाजीची धरितां हांव । सर्व कांहीं तो पुरवी ॥९९॥
त्याला करूया प्रणिपात । तोच दयाळु गुरुदेव दत्त ॥
पांचवा अध्याय अर्पितां घेत । श्रीदत्त प्रेमें भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय ६ वा

श्रीगणेशाय नम: । श्रीसरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:

प्रल्हादपुत्र विरोचन । त्याचा बलिराजा नंदन ॥
त्रैलोक्याचा राजा म्हणून । शुक्रकृपेने विराजे ॥१॥
परंतु न लाधे अमृत । त्यामुळें खवळती दैत्य ॥
देवदैत्यांचें युद्ध अद्‌भुत । अति निकरानें पेटलें ॥२॥
असुर जाहले हताश । दैवयोगें यशापयश ॥
असें मानून यत्न विशेष । करीत राहती दानव ॥३॥
भृगुकुलोत्पन्न ब्राह्मण । शुक्रादिक ज्ञानीजन ॥
विश्वजित यज्ञ महान । बली कडून करविती ॥४॥
त्यामुळें बलि बळवंत । होऊन त्रैलोक्य जिंकित ॥
इंद्रादिक अमर गुप्त । बळी स्वर्गांत विराजे ॥५॥
कष्टी देवमाता अदिती । कश्यपा झाली प्रार्थिती ॥
तो संतुष्ट होऊन चित्तीं । म्हणे विष्णूस भजावें ॥६॥
ती भजे विष्णूस अनन्य । भगवंत होती सुप्रसन्न ॥
तिच्या पोटीं अवतरून । विष्णु वामन जाहले ॥७॥
शुक्ल पक्ष भाद्रपदांत । द्वादशीस नक्षत्र हस्त ॥
मध्यान्ह काळीं देव जन्मत । सृष्टिमाता प्रसन्न दिसे ॥८॥
कश्यपअदिती संतोषत । पुष्पवृष्टि देव करीत ॥
वामनपदीं प्रणिपात । असो नित्य नम्रपणें ॥९॥
वामनाचें मौंजीबंधन । होऊन शोभे बटु वामन ॥
तेज:पुंज बटु ब्राह्मण । देवकार्यास निघाला ॥१०॥
इंद्रपद व्हावें स्थिर । म्हणून बळीराजा थोर ॥
आयति करून अपार । शताश्वमेध करीतसे ॥११॥
याचकांस करी तृप्त । बळिराजाचें वचन सत्य ॥
हें अैकून श्री भगवंत । बलिद्वारांत पातला ॥१२॥



बळीचा गुरु शुक्राचार्य । त्याच्या कृपें पावून विजय ॥
बळी भोगी राज्यअैश्वर्य । वर्म वामन जाणतसे ॥१३॥
सर्वजण होऊन विस्मित । वामना टकमक पाहत ॥
बळी करी त्याचें स्वागत । आणि विचारी काय हवें ॥१४॥
वामन त्याची स्तुति करी । बलि म्हणे सत्य वैखरी ॥
बळी त्याला नमन करी । म्हणे नि:शंक मागावें ॥१५॥
तीन पाउलें भूमिदान । द्यावी म्हणे बटु वामन ॥
बळी सांगे त्यास हंसून । कांहीं विशेष मागावें ॥१६॥
पुन्हां म्हणे बटु वामन । त्रिपाद भूमि द्यावी दान ॥
शुक्र बळीस सावधान । होईं म्हणे कपट असे ॥१७॥
बळी म्हणे इच्छादान । देतों भूमि पाउलें तीन ॥
शुक्र सांगे बोधवचन । बळीराजा न गणी तें ॥१८॥
सर्व कांहीं अशाश्वत । हें जाणून बळी वदत ॥
व्यवहार मला गौण दिसत । सत्यच मला तारील ॥१९॥
शुक्र वदे शापवचन । भ्रष्ट होसी अैश्वर्यापासून ॥
बळी धूतसे बटुचरण । आणि पूजिलें वामना ॥२०॥
बलिराजा उदक सोडून । करी त्रिपाद भूमि दान ॥
भक्तवत्सल श्री भगवान । याचक बळीचा जाहला ॥२१॥
हें पुण्यकर्म महान । पुष्पवृष्टीही देवगण ॥
करिती तेव्हां आनंदून । बलिप्रशंसा जाहली ॥२२॥
ज्याचें त्यानें सुखें भोगून । चित्तीं ठेवावें समाधान ॥
दुसऱ्याचें केलें हरण । तें न रुचे देवाला ॥२३॥
वामन विष्णूचे चरण । उदगयन दक्षिणायन ॥
यांचे अंतीं दोन चरण । तिसरा विषुवसंपातीं ॥२४॥
तीन पदीं सूर्यकिरण । भूमिसह विश्वीं भरून ॥
विराटरूपी बटु वामन । तेथें लहान बलिराजा ॥२५॥

वामन विराट ईश्वर । ठेवी अेकपाय भूमीवर ॥
दुसरा चरण स्वर्गावर । मग बळीस विचारी ॥२६॥

बलि म्हणे स्वशिरावर । तिसरें पद ठेवीं स्थिर ॥
सत्यवचनी मी गंभीर । भीति मला न वाटे ॥२७॥

वामनें बळीचें राज्य व्यापिलें । वरुणपाशें बळीस बांधिलें ॥
सर्व दैत्य खवळून उठले । धांवले वामना मारावया ॥२८॥

बलि म्हणे चला व्हा दूर । विष्णुपार्षदही देती मार ॥
रसातळीं जाती असुर । काळ विपरीत दैत्यांचा ॥२९॥

बलि म्हणे भगवंतास । दैत्यशत्रु तूंच विशेष ॥
योगी जाती ज्या पदास । तेंही देसी असुरांना ॥३०॥

सर्व कांहीं अशाश्वत । हे बिंबविण्या येसी येथ ॥
जरी झालें बंधन प्राप्त । तरी दुःख मला नाहीं ॥३१॥

बलीची पत्नी विंध्यावळी । म्हणे सत्ता तुझी सगळी ॥
तुला कोण कोणत्या काळीं । दान कसलें देणार ॥३२॥

बलीची अवस्था ओळखून । प्रल्हाद करी आगमन ॥
ब्रह्मदेवही तेथ येऊन । वामना स्तविती आदरें ॥३३॥

विधी म्हणे भगवंतास । बलीचा सत्यावर विश्वास ॥
शांत होऊन सुखी त्यास । दीनवत्सला करावें ॥३४॥

श्री भगवंत बोलती बोल । ज्यावर माझी कृपा असेल ॥
तोच सत्यावरी अढळ । राहतो निर्भयपणानें ॥३५॥

सर्वस्वाचें केलें हरण । तरी बळीचें सत्यवचन ॥
त्याला सावर्णिइंद्र करीन । स्वयें रक्षीन निर्भय ॥३६॥

बळीने परिवारासहित । सुतलीं जावें तोपर्यंत ॥
तेथें त्याला दानव दैत्य । कोणीही त्रास न देती ॥३७॥

तेथें दुर्गपाल मी होऊन । स्वयें करीन त्याचें रक्षण ॥
भक्त प्रल्हादा तुही गमन । त्यासह तेथें करावें ॥३८॥



माझें दर्शन सदोदित । घेऊन व्हावें सदा तृप्त ॥
हें अैकून प्रल्हादभक्त । कंठ दाटून स्तुति करी ॥३९॥

बली आनंदे भारावून । वामनाला स्तवी अनन्य ॥
नम्रत्वें प्रदक्षिणा नमन । करून गेला सुतलांत ॥४०॥

प्रल्हादही करी गमन । ब्रह्मादि पावले समाधान ॥
शुक्राचार्य श्रीवामन । सांगती यज्ञपूर्ण करीं ॥४१॥

पुरोहित शुक्र म्हणत । तव स्मरणें सांगता होत ॥
आणि यज्ञ सांग करीत । वामनविष्णू तोषले ॥४२॥

बलीचा पुत्र बाणासुर । वामन बसवी राज्यावर ॥
स्वर्गीं विराजे इंद्र अमर । वामनकृपें सुखी असे ॥४३॥

भूतमात्राचें हित होण्यास । संतोष कश्यपअदितीस ॥
व्हावया, ब्रह्मा वामनास । उपेंद्र करी स्वर्ग लोकीं ॥४४॥

ब्रह्मदेव सनत्कुमार । भृगु प्रभृति मुनी पितर ॥
सिद्ध गंधर्वादि अमर । वर्णिती प्रताप वामनाचा ॥४५॥

जो हें चरित्र वाचील । श्रवण वा वर्णन करील ॥
त्याचें पाप शीघ्र जाईल । वामनकृपा होतसे ॥४६॥

ऋषि देव पितृपूजन । न्यूनातिरिक्त दोष जाऊन ॥
साङ्ग होतसे परिपूर्ण । वामनचरित्रकीर्तनें ॥४७॥

चालू मन्वतंर वैवस्वत । त्यांत वामनावतार होत ॥
भक्तवत्सल श्री भगवंत । नमस्कार त्यांस असो ॥४८॥

पंचजनकन्याअसिक्नीपती । प्राचेतसदक्षप्रजापती ॥
त्यांना साठ कन्या असती । त्यांतील तेरा कश्यपाच्या ॥४९॥

मरीचि प्रजापतीचा सुत । कश्यप नामें सुविख्यात ॥
त्याला अदितीपासून होत । आदित्य विवस्वान हा ॥५०॥

त्याला तीन भार्या असत । संज्ञा छाया वडवा म्हणत ॥
संज्ञेला तीन मुलें होत । यम यमुना श्राद्धदेव ॥५१॥



तपती कन्या दोन कुमर । छायेला सावर्णि शनैश्चर ॥
वडवेलाही अश्विनीकुमार । सूर्यसंतति ही असे ॥५२॥

मागील कल्पीं सत्यव्रत । द्राविडराजा विष्णुभक्त ॥
तोच चालू मन्वंतरांत । मनु बनला श्राद्धदेव ॥५३॥

चालू श्वेतवाराह कल्पांत । सहा मन्वंतरें पुरीं होत ॥
सातवें चालू वैवस्वत । अनंत कालमापन ॥५४॥

अेकाहत्तर महा युगांत । चालू अठ्ठाविसावें असत ॥
कृत त्रेता द्वापार संपत । आतां कलियुग हें असे ॥५५॥

प्रत्येक मन्वंतरांत । सहा अधिकारी देव ठेवीत ॥
मनु देव इंद्र मनुसुत । ऋषि व अवतार विष्णूचा ॥५६॥

स्वायंभुव मन्वंतरांत । मरीच्यादि सत्पर्षि असत ॥
यज्ञ म्हणून इंद्र असत । तोच विष्णुअवतार ॥५७॥

स्वारोचिष मन्वंतरांत । ऊर्ज स्तंभादि सप्तर्षि असत ॥
रोचन इंद्र आणि होत । विभु अवतार विष्णूचा ॥५८॥

उत्तम मन्वंतरांत । प्रमदादि सप्तर्षि असत ॥
सत्यसेन अवतार होत । सत्यजित इंद्र असे ॥५९॥

तामस मन्वंतरांत । ज्योतिर्धामादि सप्तर्षि असत ॥
त्रिशिख इंद्र आणि होत । हरि अवतार विष्णूचा ॥६०॥

रैवत मन्वंतरांत । हिरण्यरोमादि सप्तर्षि असत ॥
विष्णु वैकुंठअवतार घेत । विभु इंद्र असे तेव्हां ॥६१॥

चाक्षुष मन्वंतरांत । हविष्मानादि सप्तर्षि होत ॥
मंत्रद्रुम इंद्र असत । अजित अवतार विष्णूचा ॥६२॥

वैवस्वत मन्वंतरांत । कश्यप अत्रि गौतम वसिष्ठ ॥
भारद्वाज जमदग्नि विश्वामित्र । सप्तर्षि मनु श्राद्धदेव ॥६३॥

पुरंदर इंद्र होऊन । विष्णूचा अवतार वामन ॥
आदित्यादि देवगण । मनुपुत्र इक्ष्वाकू वगैरे ॥६४॥

सावर्णि मन्वंतरांत । सार्वभौम अवतार होत ॥
तत्कृपें बलि इंद्र बनत । देहांतीं मुक्त होईल ॥६५॥

गालव कृप दीप्तिमान । परशुराम व्यास आणि दोन ॥
अश्वत्थामा ऋष्यश्रृंग मिळून । सप्तर्षि पुढें होतील ॥६६॥

ते तूर्त स्वाश्रमीं गुप्त रहात । दक्षसावर्णि मन्वंतरांत ॥
ऋषभ अवतार इंद्र अद्भुत । द्युतिमानादि सप्तर्षि ॥६७॥

ब्रह्मसावर्णि मन्वंतरांत । हविष्मानादि ऋषि होत ॥
शंभु इंद्र, अवतार होत । विश्वक्सेन विष्णूचा ॥६८॥

धर्मसावणि मन्वंतरांत । अरुणादि सप्तर्षि होत ॥
धर्मसेतु अंवतार होत । इंद्र वैधृत होईल ॥६९॥

रुद्रसावर्णि मन्वंतरांत । तपोमूर्ति आदि ऋषि होत ॥
स्वधामा अवतार होत । ऋतधामा इंद्र होईल ॥७०॥

देवसावर्णि मन्वंतरांत । निर्मोकादि सप्तर्षि होत ॥
दिवस्पति इंद्र होत । योगेश्वर हा अवतार ॥७१॥

इंद्रसावर्णि मन्वंतरांत । अग्नि आदि सप्तर्षि असत ॥
बृहद्भानु अवतार होत । शुचि इंद्र होईल ॥७२॥

या चौदा मन्वंतरांत । सहस्त्रयुगें काळ जात ॥
श्री भगवंतास प्रणिपात । मन्वादिकांसह असो ॥७३॥

मागील कल्प झाला समाप्त । तेव्हां ब्रह्मदेव निद्रा घेत ॥
मुखांतून बाहेर पडत । वेदज्ञान पूर्वीचें ॥७४॥

पाणीच पाणी पृथ्वीवर । जलप्रलय झाला थोर ॥
परी तेथें एक असुर । जिवंत सागरीं फिरतसे ॥७५॥

त्यानें केलें वेदहरण । भगवंतानें तें जाणून ॥
विशाल मत्स्यरूप घेऊन । मारी दैत्यास श्रीविष्णु ॥७६॥

त्याला असो भावें नमन । त्या कल्पांत उदक प्राशन ॥
करून करी तप दारुण । द्राविड राजा सत्यव्रत ॥७७॥

भगवंताचा परम भक्त । कृतमाला नामें नदींत ॥
तर्पण करितां अकस्मात । ओंजळींत मत्स्य दिसे ॥७८॥



त्याला टाकणारा जळांत । इतक्यांत मासा सांगत ॥
न सोडावें मला जळांत । जलचरांस घाबरतों ॥७९॥

मासा असे श्रीभगवंत । परंतु राजाला न कळत ॥
कमंडलूमधून नेत । माशास राजा स्वगृहीं ॥८०॥

परंतू मत्स्य फार वाढला । म्हणे वांचव राजा मजला ॥
राजा रांजणीं सोडी त्याला । तेथेंही फार वाढे तो ॥८१॥

तळें डोह आणि सागर । यांमध्यें त्याला नृपवर ॥
सोडूं लागला तेव्हां विचार । भूपचित्तांत उद्भवे ॥८२॥

म्हणे वाढत जासी असा । आणि सांगसी भित्रा मासा ॥
तरी देवा दिव्य पुरूषा । परीक्षा माझी न पहावी ॥८३॥

मी अज्ञानी आलों शरण । तरी होऊन सुप्रसन्न ॥
या दीनाचें करीं रक्षण । मग भगवंत सांगती ॥८४॥

सातव्या दिवशीं आजपासून । जलप्रलयीं पृथ्वी बुडून ॥
जाईल तेव्हां मी सोडीन । विस्तीर्ण नौका तुझ्याकडे ॥८५॥

सर्व औषणि प्राणिमात्र । घेऊन चढावें तूं नौकेंत ॥
सप्तर्षींसह निश्चिंत । नावेंत सुखी असावें ॥८६॥

सुटेल वारा मग महान । तेव्हां तेथें मी येईन ॥
वासुकीची दोरी करून । मम शिंगास नाव बांधी ॥८७॥

प्रलय-समुद्रीं मी फिरेन । तुमचें होईल रक्षण ॥
त्यावेळीं तुला शांतवीन । देऊन उत्तर प्रश्नाचें ॥८८॥

इतकें सांगून मासा गुप्त । राजा मत्स्यदेवास ध्यात ॥
पृथ्वीला असे बुडवीत । समुद्र प्रलयकाळाचा ॥८९॥

इतक्यांत आली तेथें नाव । मग आयतीसह तो राव ॥
नौकेंत चढून गौरव । करी केशव-मत्स्याचा ॥९०॥

सुवर्णरंगी मत्स्य महान । अभय देतसे प्रकटून ॥
सर्वांसहित राजा लीन । स्तवन करी त्या हरीचें ॥९१॥

तेव्हां मत्स्यरूपी भगवंत । सांख्ययोग कर्मासहित ॥
मत्स्यपुराण असे कथीत । राजा ब्रह्मीं रंगला ॥९२॥



पूर्ण ब्रह्म मत्स्य-भगवंत । सर्व केशव श्रीभगवंत ॥
त्याला जोडून दोन्ही हस्त । लीन व्हावें विष्णुपदीं ॥९३॥

त्याची लीला कोणा न कळे । भगवंत सकळ खेळे खेळे ॥
त्याला जे जे शरण गेले । त्यांना तारी मत्स्यदेव ॥९४॥

मनोरथ सिद्ध होतील । अंतीं उत्तम गति मिळेल ॥
मत्स्यावतार कृपा करील । विष्णूस भक्त आवडती ॥९५॥

ब्रह्मदेवाची रात्र संपत । वाराहकल्पाला आरंभ होत ॥
ब्रह्मदेवा मत्स्य भगवंत । वेदज्ञान देत असे ॥९६॥

सोमराजा अत्रिसुत । त्यापासून बुध जन्मत ॥
मनुकन्या इलेस होत । बुधापासून पुरूरवा ॥९७॥

चंद्रवंश त्यापासून । श्रीकृष्ण त्याचें दिव्य भूषण ॥
सूर्यवंश मनूपासून । श्रीराम त्यांत भवनाव ॥९८॥

देव साधु वेद ब्राह्मण । आणि रक्षावें गोधन ॥
त्यामुळें होतसे कल्याण । विष्णूही अवतरे त्यासाठीं ॥९९॥

सर्व स्वरूपीं योगेश दत्त । त्यांना नमन सर्वांसहित ॥
सहावा अध्यास स्वीकारीत । श्रीदत्त प्रेमें भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु

# अध्याय ७ वा.

श्रीगणेशाय नम: । श्रीसरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:

जग केव्हां उत्पन्न झालें । तें काल मापन वेगळें ॥
परंतु एक तत्व सगळें । अखंड त्रिकालीं विराजे ॥१॥

असे आकाश घटांत । परी घट असे आकाशांत ॥
तींच उपमा देहाप्रत । चैतन्यीं सर्व सामावलें ॥२॥

ही जाणीव सदा असावी । त्यामुळें जीवाची गति बरवी ॥
देव अवतरून नित्य दावी । युगायुगांत शाश्वत ॥३॥

त्रिगुणी व त्रिगुणातीत । असती दिगंबर श्रीदत्त ॥
स्वानंदीं असतांही रत । भक्त काजा अवतरती ॥४॥

नानारूपें धरिती दत्त । परी एकची श्री भगवंत ॥
पंचभौतिक या जगांत । देहरूपानें प्रकटती ॥५॥

भक्तांचा वाढवावा महिमा । म्हणून पुरवी सज्जनकामा ॥
योगेश दत्त भक्तप्रेमा । दाविती लीला करूनी ॥६॥

सर्व ही सिद्धि त्याच्या दासी । तेथें उणे नसे कशासी ॥
जग रहाटी चालविण्यासी । धर्म श्रीदत्त रक्षिती ॥७॥

ज्याचें त्यानें नित्य भोगावें । दुसऱ्याचें कधीं न इच्छावें ॥
उणे पडेल तें मागावें । दत्त देतील निश्चयें ॥८॥

देहवासना पुरवून । मनीं असावें दत्तस्मरण ॥
कामोपभोगीं न रंगून । रमून जावें दत्तपदीं ॥९॥

युगायुगीं योगेश दत्त । आजवरी अवतार घेत ॥
पुढें ही गुरुदेव दत्त । योगी दत्त होतील ॥१०॥

करणी त्यांची अघटित । स्मरणानें संतुष्ट होत ॥
महा भयही निवारीत । सर्वज्ञान भक्ता देती ॥११॥

चिदानंदीं सर्वदा रत । बालोन्मत्त वेषांत दत्त ॥
महायोगी ते अवधूत । दाविती पिशाच लीला ही ॥१२॥



अनसूये आनंद चढत । दत्तगुरु अत्रीचे सुत ॥
भवबंधगांठ सुटत । असाध्य ही देती भक्ता ॥१३॥

सर्व विभूति सार दत्त । असाध्य तेंही आकर्षित ॥
मधुरवाणी देती दत्त । जगत्त्रय वश होतें ॥१४॥

विरोधकांचीं मनें क्षोभत । महा संपत्ती होई प्राप्त ॥
भूमीवर सत्ता मिळत । आयुष्याची वृद्धि घडे ॥१५॥

महाशत्रु कुंठित होत । मंत्रतंत्रादि बाधा पळत ॥
रोगापासून भय नुरत ॥अरिमर्दन होतसे ॥१६॥

भूत बाधेचे उच्चाटन । होऊन घडे देहपोषण ॥
सदा काळ संतुष्ट मन । दत्तकृपेनें होतसे ॥१७॥

त्रिविध तापांचें हरण । होऊन, संसारीं कल्याण ॥
घडून येतें, जावें शरण । भक्तिभावें, श्रीगुरूला ॥१८॥

दत्तपदांवर आसक्ति । जडून निरसे भवभ्रांती ॥
सुखानें भक्त सुखी जाती । दत्तास भजा शुद्ध मनें ॥१९॥

अत्रिआश्रमीं बाळें तीन । सदा खेळती खेळ भिन्न ॥
अत्रि अनसूया तें पाहून । मनीं संतोष पावती ॥२०॥

अवतरले देव तीन । त्यांचें घ्यावया दिव्य दर्शन ॥
अत्रिआश्रमा देवगण । ऋषि भूपादिक येती ॥२१॥

मुनीजन पावती संतोष । चंद्र दुर्वास दत्त योगेश ॥
त्या भक्तांचे हरून क्लेश । दाविती मार्ग शांतीचा ॥२२॥

अत्रिआश्रमीं तीन बाळ । नित्य चाले श्रीमंगल ॥
त्रिगुणांचा घालून मेळ । अत्रिआश्रम दिव्य तीर्थ ॥२३॥

दत्तगुरु असें सांगती । धरा सदा सत्पथरीती ॥
आणि करावी अनन्यभक्ति । पुण्याचा मार्ग जोडावा ॥२४॥

परोपकार हें पुण्य । पाप तें परपीडन ॥
सर्व जनांचें सुकल्याण । चिंतावें हा धर्म असे ॥२५॥



पापमार्ग न धरावा । सदाचार सदा असावा ॥
अनाचारें गवसे ठेवा । हीनगतीचा निश्चयें ॥२६॥

जे ब्रह्मरूपीं भिनले । त्यांना बंध नाहीं उरले ॥
त्यांचा आचार त्यांस कळे । इतर दु:खीं पडतील ॥२७॥

म्हणून स्थितप्रज्ञवर्तन । सन्मार्गीं दिसे त्या धरून ॥
वर्तत जावें मनें अनन्य । नित्य रक्षीन त्या भक्तां ॥२८॥

दत्त योगेश एकावेळीं । होते कृष्ण धात्री खालीं ॥
म्हणती वेदमंत्रावळी । व्रात्यवेष धरिलासे ॥२९॥

पिंगलनाग तें पाहून । विचारी विचेष्टा वचन ॥
थोर आढ्यता आणून । मूढ पामर निंदक ॥३०॥

हा कोणता धर्माचार । कोणी बोधिला हा विचार ॥
दिसतसे हा भ्रष्टाचार । काय तुम्हांस म्हणावें ॥३१॥

दत्त त्याला हसून म्हणती । आश्रम हा पंचम रीती ॥
तो अद्याप कर्णांप्रती । पिंगला तुझ्या न आला ॥३२॥

जो विकल्प सर्व सोडुनी । जग पाही अभेदपणीं ॥
वैराग्य निर्वैर बाणवुनी । राही त्याचा हा धर्म ॥३३॥

जो ब्रह्मपदीं पोंचला । त्या आश्रम कैंचा उरला ॥
तोच अधिकारी जाहला । या वर्तनाचा बा नागा ॥३४॥

हें अैकून नागपिंगल । समजे हा परम विमल ॥
अत्रिवरद भक्तवत्सल । श्रीगुरु देव दत्त असे ॥३५॥

यापरी जाणून अंतरीं । दीन मुखें स्तवन करी ॥
बोंचक बोल क्षमा करीं । सत्पथ दावा मज दीना ॥३६॥

अशी विनंति वारंवार । अनुतापें करी खरोखर ॥
मग दयाघन सत्वर । वळले श्रीदत्त त्यावरी ॥३७॥

पिंगला अनुग्रह दिला । तो आत्म सुखा जोडला ॥
श्रीगुरु दत्ता कृपाळा । नमन असो प्रेमभरें ॥३८॥

दत्ता कडे लागावें मन । म्हणून त्याचे करावें ध्यान ॥
दत्तचरित्राचें मनन । करून रहावें दत्तमय ॥३९॥

वस्त्रें घेणें वा टाकणें । तसें देह धरणें सोडणें ॥
परी भगवंतस्मरणें । मानवजन्म-साफल्य ॥४०॥

हें सर्वदा लक्षांत ठेवून । संसारीं सुख दु:ख न गणून ॥
सर्वां भूतींचा भगवान । चित्तीं चिंतनें जोडावा ॥४१॥

दिवसामागून रात्र येत । रात्रिनंतर दिवस होत ॥
अशी परंपरा सतत । भूभ्रमणें चालू असे ॥४२॥

त्यांचा उपयोग करून । चाललें जगाचें जीवन ॥
येईल त्या स्थिती मधून । आत्मविकास साधवा ॥४३॥

दत्तप्रभूस आळवून । सुखांत असावें उदासीन ॥
दु:खावेग सहन करून । ईशचिंतनीं मन ठेवा ॥४४॥

देवाचें भजन-पूजन । ईशलीलांचें वर्णन ॥
श्रवण पठण प्रेमें ध्यान । करून देवा आळविणें ॥४५॥

मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥
भक्त-महिमा वाढवून । परमेशतत्त्व दावील ॥४६॥

देवा असो भावें प्रणती । देव दावील दिव्य प्रचीती ॥
तेथें लोकांचे कर जुळती । देवीं भाव वर्धतसे ॥४७॥

संसार-तापें जे तापती । आणि देवा शरण जाती ॥
त्यांची निरसेल आपत्ती । देव दावील निजकृपा ॥४८॥

देव-कृपेनें सुखी होऊन । सुखें करावें देवपूजन ॥
सर्वभूतहित जाणून । आपलें कर्तव्य करावें ॥४९॥

मनीं ठेवूं नये गर्व । सर्वाधार असतो देव ॥
धर्माधर्माला नेमी ठाव । तसें सदैव वर्तावें ॥५०॥

हीच खूण मनीं ठेवावी । आचरणांत ती दिसावी ॥
मग भगवंत-कृपा बरवी । अनुभवा सदा येईल ॥५१॥



जंभासुर मातला दैत्य । तो देवां जिंकी रणांत ॥
अमर जीवाशेनें पळत । हविर्भागही दैत्य घेती ॥५२॥

देवगुरु बृहस्पति । त्यांसी देव शरण जाती ॥
देवेंद्राला गुरु सांगती । दत्ता शरण रिघावें ॥५३॥

मग अत्रीचे आश्रमांत । कष्टी देवेंद्र असे येत ॥
भक्तिभावें दत्ता स्तवीत । प्रार्थी कृपा करावी ॥५४॥

श्रीदत्त दिगंबर मूर्ती । व्रात्यवेषें इंद्रा सांगती ॥
कां रे माझी करिसी स्तुती । पिसा अमंगळ मी असें ॥५५॥

देवेंद्र नम्रपणें म्हणत । तुम्ही विधिनिषेधातीत ॥
सिद्धावस्था होण्यास प्राप्त । धर्माचार इतरांना ॥५६॥

आपण ब्रह्मरूप योगेश । तवपदीं धरून विश्वास ॥
शरण आलों या दीनास । कोण रक्षील तुम्हांवीण ॥५७॥

तरी कृपा करावी पूर्ण । अवधूत पुसे तुम्ही कोण ॥
येथें येण्याचें काय कारण । इंद्र उत्तरे नम्रपणें ॥५८॥

जंभासुर प्रबळ दैत्य । आम्ही अमर पराभूत ॥
मनुष्यांपरी भटकत । स्वस्थान स्वर्ग मिळावा ॥५९॥

दत्त दयाळु भगवंत । म्हणे पाचारा युद्ध दैत्य
येथें घेऊन यावें त्वरित । मग पाहीन काय तें ॥६०॥

देव सहर्ष युद्धा जाती । दैत्यही निकरीं झगडती ॥
देव पळत पळत येती । दत्ताश्रमांत दडाले ॥६१॥

दत्तमाया कांता बनून । असे दत्ताकडे बसून ॥
दैत्य भुलले तिला पाहून । देवां सोडून तिला नेती ॥६२॥

श्रीदत्त देवांना सांगती । परकांता हरण करिती ॥
ते ते अधोगतीस जाती । माना सत्य नि:संशय ॥६३॥

मम माया दानव-नाश । करील आतां मिळेल यश ॥
युद्धा चलावें स्मरा ईश । जयश्री वरील तुम्हांला ॥६४॥



मग निर्जर गेले युद्धा । केला दैत्यांचा चेंदामेंदा ॥
विजयी झालेल्या आनंदा । पारावार न राहिला ॥६५॥

ब्रह्मा सोडून नसे माया । ती असे सदा स्वठाया ॥
त्या दैत्याचा नाश कराया । दत्त दाविती व्यवहार ॥६६॥

दत्त-कांता परत आली । दत्तां नमुनी दत्तीं गेली ॥
चकित झाली देव मंडळी । स्तवूं लागली दत्तपदां ॥६७॥

इंद्रादिक देवगण । दत्ता स्तविती प्रतिदिन ॥
आमचें असो दत्ता नमन । नित्य सुखानंद देती ॥६८॥

दक्ष प्रजापतीस प्रसूती । स्वायंभुवकन्या दिली होतीं ॥
तिला कन्या सोळा असती । त्यांतील तेरा धर्माच्या ॥६९॥

स्वाहा कन्या दिली अग्नीस । स्वधा दिली पितृगणांस ॥
सती कुमारी शंकरास । वरी अनन्य भावानें ॥७०॥

सदाशिव सच्चिदानंद । आदिगुरुपरमानंद ॥
ज्ञान-मार्गांनें आत्मानंद । सतीसह सेवीतसे ॥७१॥

अेकदां प्रजापतींच्या यज्ञांत । दक्ष प्रजापती असे येत ॥
सभाजन सत्कार करीत । उठून वंदन करून ॥७२॥

शंकर होते ध्यानमग्न । परंतु दक्षा क्रोध महान ॥
म्हणे सभेचा हा अपमान । शिष्टाचार न पाळिला ॥७३॥

संतापानें तीव्र बोलून । शिवा दिलें शाप-वचन ॥
यज्ञांतील आजपासून । रुद्रभाग बंद असो ॥७४॥

नंदिकेश्वर खवळून । म्हणे जें कर्मकांडांत मग्न ॥
ज्ञान-मार्गाचें नाहीं ज्ञान । ते द्विज जाणा पातकी ॥७५॥

भृगु क्रोधावून वदत । श्मशानवासी तुमचा नाथ ॥
वेद-मार्गापासून च्युत । पाखंडी तुम्हां म्हणतील ॥७६॥

दक्ष निघून घरीं जात । गेले कैलासीं सतीकांत ॥
प्रजापति पूर्ण करीत । यज्ञ मग पूर्ण जो ॥७७॥

दक्ष मुख्य प्रजापतींत । शिव-मत्सरें सदा तप्त ॥
अेकदां असे यज्ञ करीत । शिवसतीस नामंत्री ॥७८॥

परी सती सांगे शंकरास । चला जाऊया या यज्ञास ॥
आमंत्रण नको स्वजनांस । मग सतीस शिव सांगे ॥७९॥

तव वचन असे सत्य । पण दक्ष मला निंदी नित्य ॥
तेथें गेल्या स्वागतव्रात्य । घडेल। वाटे मरण बरें ॥८०॥

सतीला तें न आवडलें । शंकरा नमून गमन केलें ॥
भविष्य जाणून पाठविलें । शिवें स्वगणां तिच्यासह ॥८१॥

सती यज्ञमंडपीं जात । माता भगिनी आनंदत ॥
पिता दक्ष कोपून वदत । अप्रौढा सती संतापली ॥८२॥

शिवगणांस आवरून । म्हणे ताता तुजपासुन ॥
शरीर माझें हें उत्पन्न । तेंच जाळून टाकितें ॥८३॥

शिवचिंतनें समाधी लावी । शरिरांत अग्नि पेटवी ॥
शिवगणां भृगु पळवी । ऋभुदेवांचे कडून ॥८४॥

नारद कथी वर्तमान । क्रोधावे शिव तें ऐकून ॥
शंकर कोपें जटेमधून । वीरभद्र उद्भवला ॥८५॥

शिवानें गणांस पाठविलें । वीरें दक्षास मारिलें ॥
ऋषींनाही विद्रूप केलें । यज्ञ-विध्वंस जाहला ॥८६॥

देवगण पळून गेले । ब्रह्मदेवा सांगूं लागले ॥
विधिसह गेले सगळे । सदय शंकरा स्तवाया ॥८७॥

स्तविती, देवा शिवशंकरा । आदि कारणा महेश्वरा ॥
शांत व्हावें कोप आंवरा । यज्ञ-मार्गहि तुमचाच ॥८८॥

शंकर तथास्तु म्हणती । त्यांसह यज्ञस्थलीं ते जाती ॥
मेषमुखानें जिवंत करिती । दक्ष प्रजापतीस त्वरें ॥८९॥

ऋषींना अवयव दिधले । रुद्रभाग शिवास मिळे ॥
यज्ञ-कार्य सांग जाहलें । प्रसन्न झाले श्रीविष्णू ॥९०॥



दक्षा सांगती भगवंत । मी सर्वांतर्यामीं वसत ॥
शंकर ब्रह्मा विष्णु असत । सृष्टि कार्यास कारण ॥९१॥

त्यांना एक रूप मानून । सर्वभूतहित चिंतून ॥
प्रवृत्ति-निवृत्ति-मार्ग जाणून । कर्तव्याचरण करावें ॥९२॥

मग होईल समाधान । सर्वां आनंद हे ऐकून ॥
विष्णुपदीं होऊन लीन । स्तवन करिती प्रेमानें ॥९३॥

भगवंतांचा आशीर्वाद । मिळून आनंदाचा कंद ॥
लाधे म्हणून यज्ञानंद । पावून सर्व सुखावले ॥९४॥

सर्वभूतहित साधावें । म्हणून यज्ञकार्य करावें ॥
यज्ञामुळें जग सुखावें । विष्णु प्रसन्न होतसे ॥९५॥

पति शंकराचें चिंतन । करून सती गत प्राण ॥
शिव गेला मग धांवून । देह घेऊन हिंडत ॥९६॥

विष्णु शिवाला शांतवीत । सती देहांश जेथें पडत ॥
तेथें देवीचा वास नित्य । नमनें प्रसन्न शिव सती ॥९७॥

दुसरा जन्म घेई सती । हिमालय कन्या पार्वती ॥
पुन्हां मिळे शंकरपति । सती-शंकरा नमन असो ॥९८॥

ब्रह्ममाया अेकत्र वास । तेंच रूप सती-महेश ॥
विधिपुत्रही तो उमेश । सर्व अेकच संतोषती ॥९९॥

सर्व पातकें निरसून । होती दत्त सुप्रसन्न ॥
सप्तमाध्याय संपूर्ण । दत्तचरणीं समर्पिला ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय ८ वा.

श्रीगणेशाय नम: । श्रीसरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम: ।

आदि मध्य वा नाहीं अंत । तेंच स्वरूप श्रीभगवंत ।
भक्त सुखासाठीं दत्त । दाविता लीला योगाची ॥१॥

स्वत: आत्मतृप्त असून । भक्त करी जें जें अपर्ण ॥
तें तें श्रीगुरू दयाघन । दत्त स्वीकारी भक्तहिता ॥२॥

संचित प्रारब्ध क्रियमाण । हे दैवाचे प्रकार तीन ॥
आपणांकडे श्रीभगवान । भक्तसंचित घेतसे ॥३॥

भक्त करी जें जें अर्पण । तें तें पुण्यकर्म बनून ॥
ईश्वरस्मरणें दोषहीन । संचितांत स्थिर होतें ॥४॥

पुण्यपापाचें जें संचित । तें होतसे दोषरहित ॥
अंतीं नैष्कर्म्य सिद्ध होत । ब्रह्मनिर्वाण गति मिळे ॥५॥

चालू जन्मासह जें दैव । तेंच प्रारब्ध सदैव ॥
त्याला अनुसरून जीव । नित्य वर्तन करीतसे ॥६॥

जगताचें जें असे दैव । त्याला धरून वावरे जीव ॥
ईश्वर केंद्र म्हणून भाव । त्यावर नित्य ठेवावा ॥७॥

मग दैवांतून सुटत । परब्रह्मीं वृत्ति जडत ॥
दैवचालनें व्यर्थ होत । ब्रह्ममार्गांत तो वळे ॥८॥

प्रारब्ध असे इष्टानिष्ट । त्यांतून जीव आत्मनिष्ठ ॥
होतसे म्हणून संतुष्ट । सदाकाळ चित्त ठेवावें ॥९॥

आपलें जें नित्याचरण । त्याला म्हणती क्रियमाण ॥
ईशभक्तीनें त्याचें बंधन । नष्ट होतसे समूळ ॥१०॥

जगतामध्यें जें न मिळे । त्याचा पाश सहज वगळे ॥
आणि जगतीं जें जें मिळें । तें तें करावें दत्तार्पण ॥११॥

जग निर्मून तो चालवी । त्याला आहे चिंता बरवी ॥
मायेकडून सदा करवी । भक्तसांभाळ लीलेनें ॥१२॥



न इच्छितां पुरवी काम । म्हणून चिंतावा आत्माराम ॥
ईशचिंतनीं जो आराम । त्यांत संतुष्ट असावें ॥१३॥

जें जें असेल योग्य सत्य । तें तें मिळतें भक्तांस नित्य ॥
वैराग्य धरून जें जें मर्त्य । त्याचा ध्यास धरूं नये ॥१४॥

दृढभक्तिभाव धरावा । तो टिकून सदा असावा ॥
अशी प्रार्थना करून देवा । संसारीं सदा वागावें ॥१५॥

दत्ताश्रम सह्यगिरींत । तेथें रहाती सदैव दत्त ॥
परी नानारूपें धरीत । सदा फिरत भक्तहिता ॥१६॥

काशींत गंगा स्नान करी । चंदन लावी पंढरपुरीं ॥
भिक्षा घेऊन कोल्हापुरीं । पांचाळपुरीं जेवितो ॥१७॥

तुळजापुरीं धुवी हस्त । मेरूशिखरीं समाधिस्थ ॥
नानास्थानीं प्रकटे दत्त । अनंत भक्त तारावया ॥१८॥

महालक्ष्मी कोल्हापुरांत । नित्य दत्ता भोजन देत ॥
करवीरीं सती जागृत । श्री अंबे नमन दत्ता ॥१९॥

वेदशर्मा एक ब्राह्मण । त्याच्या पुत्रा व्यथा दारुण ॥
नाना उपाय झाले करून । परंतु पीडा अनिवार ॥२०॥

कधीं रडे फार विक्राळ । हंसून दावी नाना ख्याल ॥
कधीं विचित्र पळे बाळ । पडे मूर्च्छित केव्हां तरी ॥२१॥

सुदैवाचा झाला उदय । एकदां गुरू श्रीदत्तराय ॥
भिक्षेसाठीं येती सदय । वैश्वदेवकाळीं विप्राकडे ॥२२॥

अंगा असे भस्म लाविलें । परी धुळीनें दिसे भरलें ॥
घाणेरडें रूप धरिलें । परंतु तेज दडेना ॥२३॥

द्विज घाली भिक्षा सत्वर । मनामध्यें करी विचार ॥
कोण असे हा गूढवर । त्याचे मागून विप्र फिरे ॥२४॥

दत्त त्याला दगड मारी । तशाच केल्या नाना परी ॥
पण तो ब्राह्मण भाव धरी । दत्त पुसती काय काम ॥२५॥



ब्राह्मण म्हणे पुत्र बरा । व्हावा प्रार्थितों गुरूवरा ॥
त्याचा पाहून भाव खरा । स्वरूप सुंदर दाविलें ॥२६॥

प्रसन्न होऊन सांगती । सप्त समंध पुत्रा पीडिती ॥
ते परस्पर विरुद्ध गती । परी खंती करूं नये ॥२७॥

सात मंत्र द्विजा देऊन । रोज अेक मंत्र जपून ॥
सात दिवस अनुष्ठान । करण्या श्रीदत्त सांगती ॥२८॥

सात दिवसांनंतर । भला होई तुझा कुमर ॥
भिऊं नकां जा माघार । माझी कृपा तुझ्यावरी ॥२९॥

हें अैकून दत्तवचन । विप्र पावला समाधान ॥
दत्तपदीं नमन करून । येऊन वागे आज्ञेसम ॥३०॥

सात दिवसांनंतर सुत । ब्राह्मणाचा उत्तम होत ॥
वेदशर्मा दत्तास गात । होतसे मुक्त दत्तकृपें ॥३१॥

एक ब्राह्मण विष्णुदत्त । मातापुरीं असे राहात ॥
दत्तकृपा त्यावर होत । त्याची कथा परिसावी ॥३२॥

आचारधर्में वर्ततसे । वैश्वदेव करीतसे ॥
आणि बाहेर टाकीतसे । भूतबळी सदैव तो ॥३३॥

जवळ असे एक पिंपळ । त्यावर ब्रह्मराक्षस सबळ ॥
पीडीतसे जनां सकळ । तोच खाई भूतबळी ॥३४॥

त्यामुळें न छळी ब्राह्मणास । दर्शन देई त्या विप्रास ॥
परी द्विज भीतसे त्यास । राक्षस म्हणे नको भिऊं ॥३५॥

मी ब्रह्मराक्षस दारुण । तुझ्या अन्नें माझें पोषण ॥
त्याच्या फेडीसाठीं दर्शन । देतसें माग हवें तें ॥३६॥

विष्णुदत्त भार्येस पुसे । आणि सांगता झाला हर्षे ॥
दत्तदर्शन उत्तमसें । व्हावें अन्य कांहीं नको ॥३७॥

राक्षस म्हणे खरोखरी । दत्त आमुचा असे वैरी ॥
त्याचें दर्शन तुम्हांतरी । अशक्य, असें वाटतसे ॥३८॥

देवादिकही असमर्थ । ओळखावयास श्रीदत्त ॥
परी त्याला जाणती भक्त । घे तूं लक्षांत ब्राह्मणा ॥३९॥

मी त्याचा पूर्वील भक्त । कांहीं पापें हा देह मिळत ॥
त्याला ओळखतों निश्चित । तुला दावीन निश्चयें ॥४०॥

परी मन करावें दृढ । आणि वश करीं तो गूढ ॥
नको बनूं पामर मूढ । दत्तख्याल अगाध असे ॥४१॥

नानां रूपें दत्त धरील । भाव धरीं पूर्ण निर्मळ ॥
असें सांगून राक्षस खळ । लगेच गुप्त जाहला ॥४२॥

एके दिवशीं ब्रह्मराक्षस । दत्त दाखवी विष्णुदत्तास ॥
दत्त धरिती उन्मत्तवेष । सुरा दुकानीं स्थित होते ॥४३॥

मग ब्राह्मण तेथें जात । म्हणे हा अमंगळ दिसत ॥
दत्त दयाळु भगवंत । अदृश्य जाहले तत्काळ ॥४४॥

विष्णुदत्त झाला खिन्न । राक्षस त्याला उपहासून ॥
म्हणे मग पुन्हा दावीन । तेणें ब्राह्मणा संतोष ॥४५॥

एके दिनीं दत्त दयाळ । सवें घेऊन श्वानमेळ ॥
हिंडतां भरें अंगीं धूळ । राक्षसें विप्रा दाविलें ॥४६॥

विष्णुदत्त जातसे पुढें । दत्त मारी तयास खडे ॥
ब्राह्मण जीवभयें दडे । राक्षस म्हणे हें कर्म ॥४७॥

पुसे विप्रा हें काय केलें । होणार तें हो तया वेळ ॥
शरण जावें भावबळें । पुन्हां दावीन त्यावेळीं ॥४८॥

मागें पाय नकोच मुळीं । धैर्यें जावें पुढें तत्काळीं ॥
साधून घे तिसऱ्या वेळीं । न भितां भाग्य तूं भ्याडा ॥४९॥

दर्शश्राद्धीं तुम्हां क्षण । देण्या इच्छिते माझें मन ॥
अनुग्रहें करा पावन । अशी विनंति त्या करीं ॥५०॥

ब्राह्मणा वचन मानलें । बळेंच मन धीट केलें ॥
राक्षस दाखवी त्यावेळे । पत्नीही त्यासी धीर दे ॥५१॥



विष्णुदत्त जाऊन धरी । दत्त गुरूचे पाय करीं ॥
तेव्हां श्रीदत्त रूप धरी । अमंगळसें घाणेरडें ॥५२॥

मृत गर्दभमांस श्वाना । चारीतसे श्रीदत्त राणा ॥
ब्राह्मणें धरितां चरणां । मारिलें त्याला हाडकांनीं ॥५३॥

चालता हो दत्त बोलती । परी विप्र न करी खंती ॥
लोटांगण घाली पुढती । आणि आळवी नम्रपणें ॥५४॥

मग दत्त वदती त्यासी । तीनदां माझ्यापाशीं येसी ॥
माझ्या सारख्या व्रात्यापाशीं । तुझें काम काय असे ॥५५॥

राक्षसें सांगितल्यापरी । विष्णुदत्त बोले सत्वरी ॥
दत्त वदे मी अनाचारी । पितर नरकीं पडतील ॥५६॥

येरू म्हणाला तूं मुक्त । सदा ब्रह्मरूप असत ॥
आम्हांसम धर्म नसत । तुजला दत्त दयाळा ॥५७॥

हें अैकतां विप्रवचन । आपुलें रूप प्रकटून ॥
दत्त म्हणती येतों अन्य । मजसमचि सांगणें ॥५८॥

स्मशान मांस अस्थि श्वान । सर्वही गेलें पालटून ॥
त्रैमूर्ति श्रीदत्तदर्शन । देऊन धन्य त्या केलें ॥५९॥

विष्णुदत्त नम्र होऊन । म्हणे आई वडील धन्य ॥
देखिले हे तव चरण । दुर्मति मी असतांही ॥६०॥

तव स्वरूप जाणण्याला । शक्ति नसे मुळींच मजला ॥
नमन असो या चरणांला । दत्तकृपें घरीं परते ॥६१॥

पत्नीस सांगे सर्व मात । ती जाहली मोदभरित ॥
मग राक्षसाला पुसत । दुसरा कोण सांगावा ॥६२॥

येरू म्हणे श्री दत्तात्रेय । तेथें मला पुससी काय ॥
बरें, आमंत्रावे सूर्य । व गार्हपत्याग्नि श्राद्धाला ॥६३॥

मग ब्राह्मण आनंदला । श्राद्ध करी अमावास्येला ॥
श्रीगुरूदत्त त्या श्राद्धाला । प्रसन्नवदनें पातले ॥६४॥



ते विष्णुदत्ता विचारिती । अन्य ब्राह्मण कोण येती ॥
वेगें प्रार्थी सूर्यास सती । विप्र म्हणे रवि अग्नि ॥६५॥

गार्हपत्याग्नीसही प्रार्थिलें । दोघे तत्काळ तेथें आले ॥
देवस्थानीं अग्नि बसले । पितरांकडे दत्त रवि ॥६६॥

यथाविधी श्राद्ध विप्र करी । देव वदती तृप्तता पुरी ॥
द्विज बहु नम्रता धरी । आणि प्रार्थी तयांना ॥६७॥

त्यांनीं दिधला आशीर्वाद । ब्राह्मणाला अमोल मोद ॥
दत्त वदती त्याला भेद । कधींही नसे मुळींच ॥६८॥

ते म्हणती विष्णुदत्ताला । राक्षस गेला सद्‌गतीला ॥
पितृगणही मुक्त झाला । तुझा तुटला भवबंध ॥६९॥

पत्नीसह तुला मिळेल । सायुज्य मुक्ति सुनिर्मळ ॥
धन्य विष्णुदत्त बाळ । अतर्क्य भाग्य तयाचें ॥७०॥

विप्रवेषी तीनही देव । लाधले हें दैव अपूर्व ॥
देऊन आनंदाची ठेव । अंतर्धान पावले ॥७१॥

दत्तकृपेनें विष्णुदत्त । तत्काळ झाला जीवन्मुक्त ॥
लोकोपकार सदोदित । जनोद्धारा करीतसे ॥७२॥

श्रीदत्तकृपें जयावरी । विष्णुदत्त अनुग्रह करी ॥
तो कृतार्थ होई सत्वरीं । ऐशी वार्ता फांकतसे ॥७३॥

मग त्याकडे लोक अमित । आपुल्या कामा येती नित्य ॥
भाव ठेविती त्यावर सत्य । म्हणून दत्त कृपा करी ॥७४॥

विष्णुदत्त सदामुदित । जनां दाविल्या गोष्टी बहुत ॥
दत्तकृपें तो सदोदित । अतर्क्य लीला करीतसे ॥७५॥

यापरी चाले दिनक्रम । सुभक्तकामकल्पद्रुम ॥
श्रीदत्तगुरू दे आराम । कष्ट हरून सुखी करी ॥७६॥

दत्तावरी ठेवून भाव । लिहूं कथा एक अपूर्व ॥
विष्णुदत्त पावे गौरव । जनदिङ्.मूढ जाहले ॥७७॥

एकटी पत्नी घरीं ठेवून । परगांवीं एक ब्राह्मण ॥
जातां एकदां संधि साधून । झोटिंग घरीं पातला ॥७८॥

तरुणपणीं जे कामार्त । असतांना मृत्यु पावत ॥
जे जाती झोटिंग योनींत । लोकां पीडिती अनिवार ॥७९॥

झोटिंग ब्राह्मण बनत । घरधनी येतां त्वरित ॥
भार्या विचारी इतक्यांत । कसें येणें जाहलें ॥८०॥

ब्राह्मण म्हणे काम झालें । पत्नीला तें खरें वाटलें ॥
मागाहून चित्त शंकलें । पतिवर्तन पाहुनियां ॥८१॥

एकमास झाल्यावर । घरीं येतसे द्विजवर ॥
आपल्यासम अन्य नर । पाहून विचारी तूं कोण ॥८२॥

येरू म्हणे तूं कोण येसी । असे भांडती अेकमेकांसी ॥
आप्तवर्गही सत्य विप्रासी । ओळखूं शकले नाहींत ॥८३॥

घरधनी कांते पुसत । ती म्हणे हा अन्य वाटत ॥
परी उपाय नसे सुचत । नाजूक तंटा उद्भवला ॥८४॥

सर्व विष्णुदत्ताकडे जाती । विष्णुदत्त मनीं जाणती ॥
परी उघड न सांगती । युक्ति काढिली फार नामी ॥८५॥

तो दोनही ब्राह्मणां सांगे । गृहगोष्टी लिहाव्या वेगें ॥
लेखन पाहून स्त्री सांगे । एक चुके पुष्कळशी ॥८६॥

मग सांगे परत त्यांना । ही पंचक्रोशी प्रदक्षिणा ॥
करून जो सांगेल खुणा । त्याची कांता ही खरी ॥८७॥

भूतविप्र क्षणांत आला । परी खुणा सांगे सगळ्या ॥
अर्धा दिवस द्विजा लागला । व खुणाही वदे कांहींशा ॥८८॥

विष्णुदत्त पुन्हां सांगत । फिरुन यावें हा पर्वत ॥
तेथें असती सिद्ध महंत । त्यांचीं नांवें जो सांगे ॥८९॥

तो जिंकील हें खचित । मग दोन्ही विप्र निघत ॥
झोटिंग ब्राह्मण त्वरित । येऊन सांगे सर्व खरें ॥९०॥



खऱ्या ब्राह्मणा वेळ लागत । त्या न दिसती सिद्धमहंत ॥
त्यामुळें सर्वही विस्मित । म्हणती एकभूत असे ॥९१॥

पुन्हां म्हणाला विष्णुदत्त । शेवटची परीक्षा असत ॥
जो शिरे लोखंडी नळींत । आणि परत येतसे ॥९२॥

त्याची भार्या सत्य असत । म्हणून त्यांना धीर देत ॥
भूत गेलें लोहनळींत । विष्णुदत्त त्या बांधी ॥९३॥

देवदत्ताचें करी स्मरण । दत्त मंत्रें केलें बंधन ॥
आणि नळ बंद करून । पुरून टाकी पर्वतीं ॥९४॥

दत्तभक्तें जाणिलें भूत । युक्तियुक्तीनें त्यास बांधीत ॥
खरा ब्राह्मण संतोषत । लोकही म्हणती धन्य धन्य ॥९५॥

लोकांची खात्री जाहली । विप्रकांता ही आनंदली ॥
दंपती लागे पदकमळीं । आमुचें ही नमन असो ॥९६॥

विष्णुदत्त श्रीदत्तभक्त । जन कल्याणास झटत ॥
अंतरी गर्व न धरीत । म्हणून दत्त यश दे त्या ॥९७॥

या कथेचें करिती श्रवण । त्यांचें भूतबाधेपासून ॥
श्रीदत्त करिती रक्षण । भक्तप्रचीती सत्य असे ॥९८॥

दत्तदेव फार दयाळ । कोणा कळेल त्याचा खेळ ॥
त्या नमन असो प्रेमळ । दत्ता कृपा धरावी हो ॥९९॥

श्रीदत्त तथास्तु म्हणती । त्यांची लीला तेच जाणती
विजय हस्तें अध्याय घेती । अष्टमाध्याय गोड हा ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय ९ वा

॥गणेशाय नम: । श्रीसरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम: ।

दत्तकृपें तरले जन । त्यांचें करी कोण गणन ॥
कृपाळू दत्त भगवान । सदाकाळ भक्तप्रिय ॥१॥

पूर्वकाळीं नागपुरांत । चंद्रवंशी नृपविख्यात ॥
आयुराजा चित्तीं झुरत । पुत्र नाहीं म्हणोनियां ॥२॥

दत्तांचा महिमा ऐकून । सह्यपर्वतीं करी गमन ॥
सेवावया दत्तचरण । वासना धरून पुत्राची ॥३॥

पण श्रीदत्त दिगंबर । व्रात्य क्रीडेंत मग्न फार ॥
विस्मय पावे नृप अपार । नमन करी श्रद्धेनें ॥४॥

दत्त तया झिडकारिती । कैंचा राजा आला म्हणती ॥
आम्ही न गणूं तया प्रती । काय आमुचें करील ॥५॥

परंतु आयु सुज्ञ असे । कृपा करावी म्हणतसे ॥
सेवा करीत कष्टतसे । बहुत काळ गेला असे ॥६॥

दत्तचरित्रची गहन । राजा वागे प्रेम धरून ॥
मग दत्त करिती प्रश्न । कां कष्टसी वृथा तूं ॥७॥

रे मी अधार्मिक निश्चित । जाई आपल्या राज्याप्रत ॥
पण निर्मळ राजचित्त । टाकूं नये असें प्रार्थी ॥८॥

दृढ भक्तीनें उगा दत्त । कांहीं काळानंतर सांगत ॥
दे मद्यमांस मजप्रत । आणून नित्य प्रेमानें ॥९॥

तसाच राजा वागतसे । मनीं मुळीं विटत नसे ॥
दत्त पुसती त्यास हर्षे । अरे काय हवें तुला ॥१०॥

पाहून दत्तांस प्रसन्न । सांगे राजा नम्रता धरून ॥
पुत्र हवा मजकारण । धर्मनिष्ठ अजिंक्यसा ॥११॥

श्रद्धा देवब्राह्मणांवर । संतोषावे सदा पितुर ॥
समर्थ गुरो द्यावा वर । श्रीदत्त म्हणती तथास्तु ॥१२॥

व भूपतीस फळ दिलें । भार्येस खाण्या दे म्हणाले ॥
नृपतिमन आनंदले । दत्ताज्ञें राज्यीं पातला ॥१३॥

राजाची राणी इंदुमती । दत्तांस स्मरे भावें चित्तीं ॥
प्रसाद फळ झाली भक्षिती । राजदंपत्य हर्षलें ॥१४॥

पतीलागीं संतोषवोनी । इंदुमति झाली गर्भिणी ॥
दत्तकृपेनें भाग्यखाणी । स्वप्न उत्तम पहातसे ॥१५॥

महाविष्णुसम पुरुष । दे हातांत मोतीं सहर्ष ॥
अभिषेकी राणीचें शीर्ष । पवित्र शंखोदकानें ॥१६॥

दुसरे दिवशीं भूपति । राणीस्वप्न शौनकाप्रति ॥
सांगून पुसे फलश्रुति । ऋषि म्हणती नको चिंता ॥१७॥

तुम्हीं भाग्यवान बहुत । विष्णुअंशें गर्भ ठरत ॥
तव कुला भूषणभूत । निष्कंटक राज्य करी ॥१८॥

सकळ शत्रूंस जिंकून । राजश्रेष्ठ इंद्रासमान ॥
दत्तप्रसाद असे धन्य । पुत्र लाधे जणूं विष्णु ॥१९॥

अैकून स्वप्नाचा अर्थ । राजाराणी संतुष्टत ॥
डोहळेही उत्तम होत । दत्तलीला चिंत्य असे ॥२०॥

कांचनपुरीं हुंड राक्षस । महाबळी छळी पृथ्वीस ॥
मातला दैत्य देवेंद्रास । जिंकून स्वर्गीं राज्यकरी ॥२१॥

एकदां अशोकसुंदरी । गंधर्वकन्ये दैत्य धरी ।
पण ती हुंडास धि:कारी । शाप वदली तयाला ॥२२॥

नीती नसे तूं दुष्टखळ । उगीच तुझी वळवळ ॥
व्यर्थ तुझा प्रताप-खेळ । नहुष तुला मारील ॥२३॥

त्वरें आपण निघून गेली । दृढ तप करूं लागली ॥
मनीं चिंती मिळावा बळी । नहुष नवरा प्रतापी ॥२४॥

मग कांहीं काळानंतर । हुंड-कन्या अैके विचार
नंदनवनांत सुंदर । फिरण्यात गेली असतांना ॥२५॥



देवांचे भाट आपसांत । होते गुप्त गोष्टी करीत ॥
नहुष दिव्य आयुसुत । हुंड राक्षसा मारील ॥२६॥

मुलगी सांगे हें बापाला । हुंड मनांत दचकला ॥
सुंदरी शापही आठवला । म्हणे अशुभ हें दिसे ॥२७॥

देवांचें गुप्त कारस्थान । अवचित आलें कळून ॥
तरी असावें सावधान । विघ्न करून पहावें ॥२८॥

गुप्तपणें आयुगृहास । जाऊन पाही तो राणीस ॥
तिच्या देहीं तेज विशेष । दिसे दैत्यास विष्णूसम ॥२९॥

राणीभोंवतीं एक शक्ति । सुदर्शनापरी फिरती ॥
पाहून हुंड म्हणे चित्तीं । खास गर्भ हा शत्रूचा ॥३०॥

यास मारणें हाच धर्म । ठरवून, तो माया कर्म ॥
करून पाडी दुष्ट परम । विक्राळ स्वप्नें राणीला ॥३१॥

पण सगर्भ इंदुमति । भोगी अभंग सुखशांति ॥
ती न जाणे रक्षण शक्ति । म्हणून प्रार्थी सूर्याला ॥३२॥

हें भास्करा तूं दिनकर । माझा आनंददिनकर ॥
सकळ क्लेश दूर कर । राखें मजला क्षेम भली ॥३३॥

हुंडाचा प्रयत्न फसला । राणीपोटीं गर्भ वाढला ॥
प्रसूतिकाळ जवळ आला । राजा प्रार्थी दत्तासी ॥३४॥

मग रात्रीं सुवेळीं पुत्र । प्रसवे इंदुमति पवित्र ॥
आनंदी आनंद सर्वत्र । श्रीदत्तकृपें जाहला ॥३५॥

दत्त-सेवासुत पाहून । राजा संतोषून म्हणे धन्य
वस्त्रें भूषणें धनधान्य । भूमि-दानही तो करी ॥३६॥

सर्व विधि योग्य करून । म्हणे फेडलें पितृऋण ॥
ज्योतिषी सांगती लक्षण । पुत्र उत्तम हा दिसे ॥३७॥

धर्माचारें भला वागेल । तव कुळभूषण होईल ॥
परंतु संकट उद्भवेल । तुम्हांस कष्ट बाळपणीं ॥३८॥



तथापि निरसेल चिंता । सुख-साम्राज्य येई हाता ॥
ऐकून भविष्याची वार्ता । राजा गौरवी गणकांना ॥३९॥

गुप्तपणें हुंडराक्षस । पुत्रा पाहून पावे त्रास ॥
पाहून तेज बहुवस । म्हणे साच हाच शत्रू ॥४०॥

शत्रूचा घ्यावा सदा प्राण । तो न म्हणावा थोर लहान ॥
असा विचार झणीं योजून । मोहिनी घाली त्याठायीं ॥४१॥

राणी दासी सर्व भ्रमित । झोंपेंत पूर्ण गुंग होत ॥
मध्यरात्र उलटून जात । हुंड पळवी पुत्राला ॥४२॥

मग सावध इंदुमति । सर्वांची निरसली भ्रांती ॥
ऊरशीर तेव्हां पिटिती । पुत्र न दिसे म्हणून ॥४३॥

दत्तप्रसादें पुत्र झाला । आणि कसा हा आला घाला ॥
म्हणोनि राजादि त्यावेळां । आकांत घोर करिताती ॥४४॥

हुंड स्वनगरीं पोंचला । भार्येकडे मुलगा दिला ॥
सांगे मारून दे खाण्याला । देवीं निर्मिला मम शत्रू ॥४५॥

ती तो देतसे दासीकडे । दासी देई आचाऱ्याकडे ॥
त्यानें मारितां शस्त्र मोडे । बाळक हसूं लागला ॥४६॥

नंतर दासी व आचारी । म्हणती मूल दिव्य फारी ॥
दया उपजली अंतरीं । विचार त्यांनीं योजिला ॥४७॥

देव यांचे रक्षण करी । मग बाळास कोण मारी ॥
वसिष्ठाश्रमीं फार दूरी । बाळका नेऊन ठेविती ॥४८॥

एका हरिणास मारून । मांस पाक त्वरें करून ॥
असुरास दिलें भोजन । खात्री करून त्यावेळीं ॥४९॥

हुंड म्हणे भय नुरला । वैऱ्याला मी ठार मारिला ॥
आनंदें मांसपाक केला । खाऊन निर्धास्त मी झालों ॥५०॥

वसिष्ठाश्रमीं सुप्रभातीं । मुनीजन बाळा पहाती ॥
वसिष्ठ समाधि लाविती । आणि सांगती बाळ कथा ॥५१॥

ऋषि मंडळी आनंदली । बाळा आशीर्वाद वदली ॥
श्रीदत्तकृपेची साउली । बाळा कांहीं उणे नसे ॥५२॥

स्मरून दत्त दिगंबर । वसिष्ठ करिती संस्कार ॥
पाळिती प्रेमें ऋषिवर । नहुष नाम ठेविलें ॥५३॥

यथाकाळीं उपनयन । करून विद्या शिकवून ॥
राजधर्मादि पढवून । वीर उत्तम केलासे ॥५४॥

इकडे आयु-इंदुमती । श्रीदत्तचरण आठविती ॥
नानापरी शोक करिती । दत्तीं ध्यान लागलें ॥५५॥

राजदु:ख दत्त जाणती । सकाळीं नारदा पाठविती ॥
नारद म्हणे रायाप्रती । शोक वृथा करूं नको ॥५६॥

देह असे हा अशाश्वत । अक्षर नित्य आत्मतत्व ॥
दत्तें देऊन दिव्यसुत । नश्वर सर्व जाणविलें ॥५७॥

जगताचा चालला खेळ । दैवी गुण व्हावे प्रबळ ॥
म्हणून तुझा दिव्य बाळ । अदृश्य तुम्हां झालासे ॥५८॥

प्रमुख मुनी त्याला पाळी । दत्तचिंतनीं सर्व काळीं ॥
सुखी रहावें योग्य वेळीं । पुत्र तुम्हांला भेटेल ॥५९॥

तव पुत्रा नांव नहुष । देवां नरां सुखसंतोष ॥
देईल करून हुंडनाश । कांते सह येईल तो ॥६०॥

यज्ञादिक मग करून । तुम्ही पावा क्षेम कल्याण ॥
नहुषही सम्राट होऊन । उच्च ऐश्वर्य भोगील ॥६१॥

दत्तीं लागलें तुझें ध्यान । दत्त देती मज धाडून ॥
दत्तवाणी केली कथन । निश्चिंत रहा मी जातों ॥६२॥

राजाराणींची चिंता गेली । दत्ता स्मरती वेळोवेळीं ॥
हुंडही म्हणे झालों बळी । वसिष्ठाश्रमीं बाळ वाढे ॥६३॥

नहुष झाला श्रेष्ठ वीर । हुंड मातला अनिवार ॥
वसिष्ठ सांगती विचार । नहुषा हुंडानाशाचा ॥६४॥



ऐकून सर्व वर्तमान । नहुष गेला गोंधळून ॥
आठवून दत्तचरण । नमन करी भक्तीनें ॥६५॥

नहुष कोपला दारुण । करण्यास हुंडहनन ॥
मात्यापित्या मनीं नमून । वसिष्ठचरणीं लागला ॥६६॥

नहुष आश्चर्यचकित । सगद्गद कंठ होत ॥
आशीर्वाद असे मागत । हुंडा मारण्या सज्जला ॥६७॥

वसिष्ठ आणि अरुंधती । बाळास आशीर्वाद देती ॥
उचंबळल्या मनोवृत्ती । सर्वांच्याही त्यावेळीं ॥६८॥

बाळाचें पालनपोषण । केलें मुलगा समजून ॥
नहुषही कुमार धन्य । त्यांना माता पिता समजे ॥६९॥

पुन्हां नमून ऋषिचरण । करीं घेई धनुष्य बाण ॥
करूनियां दत्त स्मरण । हुंडा मारण्या निघाला ॥७०॥

नहुष निघाला पाहून । सुरथ दे इंद्र धाडून ॥
मातलि सारथि निपुण । येऊन वंदी तयाला ॥७१॥

सांगे सकळ वर्तमान । मग रथा नमस्कारून ॥
आंत बसला आयुनंदन । देवसैन्यही पातलें ॥७२॥

हुंडाच्या कांचन नगरीं । नहुषाची पोंचली स्वारी ॥
हुंड दचके मनीं भारीं । सत्वर हेर पाठविला ॥७३॥

आयुपुत्र नहुष आला । असें हेर सांगतां झाला ॥
हुंड खवळून कांतेला । विचारी वृत्त मागचें ॥७४॥

भार्यादि सांगती हुंडाला । खरोखर पुत्रा मारिला ॥
त्याचा पाक आपण खाल्ला । संशय नको मुळींच ॥७५॥

हुंड म्हणे नशीब फिरलें । सकळ सैन्य जगविलें ॥
सेना सागरा आज्ञापिलें । प्राणान्त युद्ध करावया ॥७६॥

राक्षसाची कडक शिस्त । सेना बनली रणीं मस्त ॥
युद्ध असे प्रचंड होत । देवसैन्य घाबरलें ॥७७॥



मग नहुष श्रेष्ठ वीर । सोडूं लागला तीव्र शर ॥
जसा पाऊस पृथ्वीवर । मुसळधार ओततो ॥७८॥

दैत्यसैन्यीं आकांत झाला । कवणाचा पाय तुटला ॥
कोणाचा नेत्रचि फुटला । कोण मेला एकदम ॥७९॥

मधोमध कोणी फाटले । कवणाचें शीर पडलें ॥
हात गेले पोट फुटलें । छिन्नभिन्न देह होती ॥८०॥

रथ घोडे मोडले मेले । उन्मत्त हत्तीही पळाले ॥
हुंडसैन्य खचूं लागलें । नद्या वाहती रक्ताच्या ॥८१॥

नहुष होतसे विजयी । देवादि ऋषि ठायीं ठायीं ॥
जमून म्हणती सदा विजयी । नहुषा देवा करीं तूं ॥८२॥

हे देखावे अवलोकून । हुंडासुरा क्रोध दारुण ॥
पुढें येऊन म्हणे गर्जून । नहुषा तुझी किं कथा ॥८३॥

देवांदिकांचा मीच शास्ता । हें न जाणून मूर्खा मस्ता ॥
आरंभिसी समरकथा । जा माघारा जीवाशें ॥८४॥

नहुष बोले वीरबोल । दैत्य दुष्टा तूं अमंगळ ॥
देवऋषींचा केला छळ । तुझें कंदन करणार ॥८५॥

तुझा मृत्यु जवळी आला । म्हणून करिसी गलबला ॥
तरी तुजला येच वेळां । धाडितों यमसदनासी ॥८६॥

जरी अससी बळवंत । तरी दाखव शक्ति येथ ॥
उगीच बडबड व्यर्थ । कारे करिसी नष्टा तूं ॥८७॥

हें एकतां नहुषवचन । हुंड गेलासे खवळून ॥
दोघेही मस्त चवताळून । करिती रण तुंबळ ॥८८॥

अेकमेकां अमित शक्ति । दावून युद्ध करिताती ॥
दैत्य सोडी प्रचंड शक्ति । नहुष त्वरें ती मोडी ॥८९॥

आणि विंधिलें असुराला । राक्षस रक्तबंबाळ झाला ॥
हुंडें नहुषास झांकिला । बाणजाळ वर्षोनियां ॥९०॥

पण नहुषें तें छेदिलें । असुरहस्तही तोडिले ॥
हुंडासुरें तोंड वासिलें । शीघ्र धांवला भक्षावया ॥९१॥

नहुष तोडी त्याचे चरण । करी मनीं दत्तस्मरण ॥
ऐंद्रशक्ति शरीं लावून । हुंडा मारी गुरुकृपें ॥९२॥

बाकी सेना उध्वस्त झाली । आनंदली देवमंडळी ॥
ऋषिवर वदती त्यावेळीं । आशीर्वचनें आनंदें ॥९३॥

मग नहुषाच्या आज्ञेनें । देवादि घेती आपुलीं स्थानें ॥
ज्यांचें त्यांस मिळाल्यानें । तुष्ट गंधर्व देव नर ॥९४॥

इतक्यांत तेथें आली । अशोक सुंदरी कन्या भली ॥
सांगून माहिती सगळी । नहुषासह निघाली ती ॥९५॥

नहुष आला वसिष्ठाश्रमीं । सांगून सर्व वृत्त नमी ॥
वसिष्ठ कुरवाळिती प्रेमीं । म्हणती हीच तुझी भार्या ॥९६॥

हर्षभरें लाविलें लग्न । जणुं दिसती रतिमदन ॥
सकलांचें आशीर्वचन । घेऊन गेला स्वराज्यीं ॥९७॥

बाळ होतांच नष्ट झाला । उत्तम कांतेसहित आला ॥
अपार आनंदसोहळा । कसा वर्णावा शब्दांनीं ॥९८॥

आयुराजा इंदुमतिराणी । संतुष्ट पुत्र-सून पाहोनी ॥
विष्णुअंश पुत्रदानीं । दत्तवाणी सत्य असे ॥९९॥

दत्तलीला अगाध गूढ । करी भक्तांचें कल्याण रूढ ॥
आत्मानंदीं नेतसे मूढ । नवमाध्याय दत्तार्पण ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु